


रायगड, शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

**नारळाचीवाडी विकणे आहे**
**अलिबाग- नागाव मेन रोडटच**
निसर्गरम्य माऊंटन-लेक व्ह्यू, क्लियर टायटल, संपूर्ण तार कंपाऊड गेट, सिटी सर्वे, १६ गुंठे, 24 x 7 CCTV निरीक्षण, प्रीमियम लोकेशन, एस.टी. स्टॉपला लागून, नळ, इलेक्ट्रिकल पोल जवळच, White Transaction only, डायरेक्ट पार्टी, एजंट चालेल.
**संपर्क - ९७६९१०८१७०**

आजचा रंग
करडा

आजचा अग्रलेख
मराठीचा 'जीवनगौरव'

## वेधक

### हर्षवर्धन पाटलांचा भाजपाला रामराम

**इंदापूर :** भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी भाजपला रामराम ठोकून शरद पवार गटाची वाट धरली आहे. शुक्रवारी त्यांनी पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली. सुरुवातीला पाटलांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधून शरद पवार गटात जाण्याबाबत विचारणा केली. कार्यकर्त्यांनी त्यांच्या मताला समर्थन दिलं. शरद पवार गटात प्रवेश घेण्याचा निर्णय घेण्यापूर्वी आपण देवेंद्र फडणवीसांशी चर्चा केली असून, त्यांनी दुसरा पर्याय दिला होता, अशी माहिती खुद्द हर्षवर्धन पाटलांनी दिली. सोमवारी पवार गटात पक्ष प्रवेश होणार आहे.

### ३० नक्षलवाद्यांचा जवानांकडून खात्मा

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांविरोधात सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. नारायणपूरमध्ये झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी ३० नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. सध्या परिसरात चकमक सुरू असून, हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, नक्षलवाद्यांची ओळख पटवण्यासाठी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. ठार झालेल्या नक्षलवाद्यांकडून शस्त्रे-दारुगोळा जप्त करण्यात आला आहे. दंतेवाडाचे एसपी गौरव राय यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. सध्या या भागात लष्कराकडून शोधमोहीम सुरू आहे.

### सत्ताधाऱ्यांकडूनच सरकारची कोंडी

**मुंबई :** धनगर आणि धनगर एकच असल्याचा जीआर राज्य सरकारने काढला आहे. दरम्यान, धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, याला सत्ताधारी आदिवासी आमदारांकडून विरोध केला जात आहे. तसेच गेल्या १५ दिवसांपासून आदिवासी विद्यार्थ्यांकडून पेसाभरती अंतर्गत भरतीच्या आंदोलक करत आहेत. मात्र, यावर कुठलाही तोडगा निघत नसल्याचे शुक्रवारी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ आणि आ. हिरामण खोसकर यांनी थेट मंत्रालयातील संरक्षक जाळीवरच उड्या मारल्या. आमदारांच्या कृत्याने सरकारची पुरती कोंडी झाल्याचे दिसून आले आहे.

## चित्रलेखा पाटील यांचा अपमान केल्याप्रकरणी

# शेकाप आक्रमक

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांचा अपमान केल्याप्रकरणी शेकाप महिला कार्यकर्त्यांकडून अलिबाग तालुक्यात शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष राजा केणी यांनी केलेल्या चुकीच्या वर्तनामुळे शेकापच्या महिला नेत्या आक्रमक झाल्या. तरुणांसाठी, महिलांसाठी, सर्वसामान्यांसाठी, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी कायम लढणाऱ्या चित्रलेखा पाटील यांचा अपमान सहन न झाल्यामुळे शेकापच्या महिला कार्यकर्त्यांच्या संतापाचा निषेध मोर्चात उद्रेक झाला.**



### रॅलीतून पेझारीमध्ये शेकाप महिलांची ताकद

चित्रलेखा पाटील यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य केल्याबद्दल शेतकरी कामगार पक्ष तालुका महिला आघाडीच्यावतीने पेझारी नाका ते तपासणी नाक्यापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते. राजा केणी, सचिन धुमाळ यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. 'लाल बावटे की जय' असा जयघोष करीत हातात लाल बावटा घेत ही रॅली निघाली.

शेकापच्या महिला युवा कार्यकर्त्यांनी पेझारी येथील निषेध मोर्चात राजा केणींसह सचिन धुमाळ यांच्यावर टीकास्त्र डागलं. त्या म्हणाल्या, शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष राजा केणी यांचे वक्तव्य हे केवळ महिलांचे अपमान करणारे आहे. सध्या शिंदे गटाचे लोक बोलण्याचे तारतम्य पाळत नाही. यांना वाटते

### महिलांनी व्यक्त केला संताप, घोषणाबाजीतून तीव्र निषेध

की आम्ही काहीही बोललो तरी आम्हाला पोलीस किंवा कुणी काहीही शिक्षा किंवा कारवाई करू शकत नाही. या मस्तवालपणातून हे वक्तव्य होत आहे. शेतकरी आणि महिलांचा अपमान करणं हाच तुमचा अजेंडा आहे का?, अशी टीका भैरवी जाधव यांनी केली आहे.

शेकाप तालुका महिला आघाडीच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी पेझारी नाका येथे राजा केणी व सचिन धुमाळ यांच्याविरोधात निषेध मोर्चा काढला. पान २ वर

## पेट्रोल पंप सुरु करा



शेकापची मागणी

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पेट्रोल भरण्यासाठी दीड-दोन किलोमीटरचे अंतर कपावे लागत असल्याने वसाहतीत पंप असावा ही कामोठेकरांची मागणी होती. कामोठेकरांच्या मागणीची दखल घेत सिडकोने भूखंड उपलब्ध करून दिला. मात्र, सिडकोने उपलब्ध करून दिलेला हा भूखंड सरकारी लालफितीच्या पान २ वर



● पेझारी येथील म्हसोबा मंदिरात दर्शन घेताना शेकाप सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरुणीवर अत्याचार

**| पनवेल | वार्ताहर |**

कळंबोलीत राहणाऱ्या तरुणाने २४ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर मागील वर्षभर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. सागर विजयकुमार मिश्रा (२५) असे या तरुणाचे नाव असून, कळंबोली पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

या घटनेतील आरोपी सागर मिश्रा कळंबोलीत, तर पीडित तरुणी तळोजा येथे राहण्यास आहे. वर्षभरापूर्वी या दोघांची ओळख झाली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये मैत्री होऊन त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले होते. यादरम्यान सागर मिश्रा याने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून कळंबोलीतील रोडपाली गाव येथील विशाल रो-हाऊसमध्ये नेऊन तिच्यावर अनेकवेळा लैंगिक अत्याचार केले. यावेळी सागर मिश्रा याने शारीरिक संबंध करतानाचे फोटो काढले. त्यानंतर सप्टेंबर महिन्यामध्ये सागर मिश्रा याने सदर तरुणीसोबत लग्न करण्यास नकार दिला. पण, तरीही तिने त्याच्यापाठीमागे पान २ वर

### पुण्यात तरुणीवर सामूहिक अत्याचार

**पुणे :** पुण्याजवळील बोपदेव घाटात मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर गुरुवारी (दि. ३) रात्री सामूहिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मानवाधिकार संघटनेचा कार्यकर्ता असल्याचे कारण देत आधी अपहरण करण्यात आले आणि त्यानंतर तिघांनी त्या तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी याप्रकरणी राजेखा करीम पठाण याच्यासह तिघांना अटक केली आहे.

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी मित्रासह फिरण्यासाठी बोपदेव घाटात गेली होती. तेव्हा तिघेजण तिथे आले आणि आपण मानवाधिकार संघटनेचे कार्यकर्ते असल्याचं सांगून त्यांनी तरुणी आणि तिच्या मित्राचे फोटो काढले. त्यानंतर संबंधित तरूणीला कारमध्ये बसवून कार येवलेवाडी भागातील एका गल्लीत नेण्यात आली. तिथे या तरुणीवर तिघांनी लैंगिक अत्याचार केले.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**माणगाव :** माणगावपासून १२ कि.मी. अंतरावर असणाऱ्या पोटणेर गावच्या हद्दीत कार आणि मोटारसायलकचा भीषण अपघात झाला. मुंबई-गोवा महामार्गावर भरधाव वेगाने येणाऱ्या इंडीव्हर कारने पाठीमागून मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात गुरुवारी (दि. ३) सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद उमेश शंकर खैरे (४०) रा. धाटाव, ता. रोहा यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

याबाबत माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील मयत भागोजी मालू खैरे (६७) रा. धाटाव, पान २ वर




## अकृषिक कर पूर्णपणे माफ

राज्य सरकारचा निर्णय

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ करणे, प्राचीन व ऐतिहासिक वास्तू, गडकिल्ल्यांचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद, मच्छिमारांच्या कल्याणकारी महामंडळास मजुरी देत ५० कोटींचा निधी मंजूर करण्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत घेण्यात आला. शुक्रवारी (दि. ४) राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

राज्य सरकारच्या आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महसूल विभागांतर्गत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ करण्यात आला आहे. यामुळे अकृषिक जमीनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. महसूल न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवणार (महसूल विभाग) दौंड येथे बहुउद्देशीय सभागृह नाट्यगृहासाठी शासकीय जमीन (महसूल विभाग) त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामास मान्यता (जलसंपदा विभाग) टेंभू उपसा सिंचन योजनेस स्व. अनिल भाऊ बाबर यांचे नाव ( जलसंपदा विभाग) पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना गती देणार सिल्लोड मधील जमिनीला सिंचन (जलसंपदा विभाग) प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे पान २ वर

## पेण भाजपामध्ये गृहकलह

**| पेण | विशेष प्रतिनिधी |**

१९१ पेण विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये भाजपला पेणची जागा सुटली असल्यामुळे उमेदवार हा भाजपचाच. मात्र, वैकुंठावरील कौटुंबिक यादवी अचानक समोर आल्याने उमेदवार कोण, हा निर्णय पक्षश्रेष्ठीला घेणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी हॉटेल सौभाग्यईन येथे भाजपच्या पदाधिकाऱ्यांची गुप्त बैठक घेऊन उमेदवार कोण, असे मतदान घ्यावे लागल्याची जोरदार चर्चा आहे.

विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांना वाढत्या वयोमानानुसार



उमेदवार ठरविण्यात अपयश

पक्षश्रेष्ठी उमेदवारी देण्यास नकार देत असल्याचे समजते. परंतु, स्वतः रवीशेठ पाटील यांना पुन्हा उमेदवारी करायची आहे. तर, प्रीतम पाटील या उमेदवार असतील, असे एका जाहीर समारंभामध्ये दोन वर्षांपूर्वी दस्तुरखुद्द बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी बोलून दाखविले होते. दुसरीकडे भाजप जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा पान २ वर

### कर्जत मतदारसंघात वारं फिरलं

## सुधाकर घारे वाजवणार तुतारी ?

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) जिल्हा नेते सुधाकर घारे हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून आगामी निवडणुकीचे रणशिंग फुंकणार अशी चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे. दरम्यान, शिवसेना ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी हे कर्जत विधानसभा मतदारसंघामधून मशाल चिन्ह असलेला उमेदवार लढणार असल्याबद्दल आश्वासक असल्याचे दिसून येत आहेत.

पितृ पक्ष संपल्यानंतर आणि घट बसल्यानंतर कर्जत विधानसभा मतदारसंघात प्रचंड राजकीय घडामोडी पडद्यामागून घडू लागल्या आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये 'काटे की टक्कर' की 'पक्षांतरे' यावर जोरदार राजकीय पान २ वर



ठाकरे गटाकडून मतदारसंघावर दावेदारी

**सुधाकर घारे यांच्याकडून दररोज वेगवेगळ्या स्तरावर महाविकास आघाडीचे दार ठोठावले जात आहे, अशी चर्चा सुरू आहे. पण, सुधाकर घारे यांनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला आणि कर्जत मतदारसंघ महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटला नाही तर अनेक अडचणी घारे यांच्यासाठी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे आयत्यावेळी मशाल हाती घेण्याची वेळदेखील येऊ शकते. त्यावेळी विद्यमान आमदारांचा पराभव आणि निवडून येण्याची क्षमता हाच एकमेव निकष महाविकास आघाडी वापरणार आहे. त्यामुळे नितीन सावंत यांच्या काहीशी पक्क्या समजल्या जाणाऱ्या उमेदवारीबद्दल संशय व्यक्त होऊ लागला आहे.**



## पान १ वरून

## शेकाप आक्रमक

या मोर्चाला मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांना महिलांकडून निवेदन देण्यात आले. तसेच महिलांचा अनादर केल्याप्रकरणी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी चित्रलेखा पाटील यांची जाहीर माफी मागावी, अन्यथा त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून करण्यात आली.

समाज व्यसनाच्या विळख्यात सापडला आहे. त्याविरोधात महिलांनी ठामपणे उभे राहणे गरजेचे आहे, असे वक्तव्य चित्रलेखा पाटील यांनी मेळाव्यात केले. या वक्तव्याचा चुकीचा अर्थ घेऊन शिंदे गटातील तालुक्यातील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी निषेध आंदोलन केले. चित्रलेखा पाटील यांचा अपमान केला. तसेच त्या कृत्याचा व्हीडीओ समाज माध्यमांवर पाठवून त्यांची बदनामी केली. याबाबत महिलांसह तरुणींनी संतप्त प्रतिक्रिया देत बदनामी करणाऱ्यांविरोधात निषेध व्यक्त केला.

दोन दिवसांपूर्वी राजा केणी आणि सचिन धुमाळ तसेच इतर शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी चित्रलेखा पाटील यांच्याबाबत बेताल वक्तव्य केले. या कृत्याच्या निषेधार्थ शेकाप तालुका महिला आघाडीच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी पेझारी नाका येथे निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी निषेधार्थ घोषणा करत राजा केणी आणि सचिन धुमाळ यांच्याविरोधात नाराजी व्यक्त केली. नको लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री शिकवा तुमच्या कार्यकर्त्यांना, अशा घोषणा महिलांनी एकत्र येऊन दिल्या.

शिक्षण असूनदेखील तरुणाईला रोजगार नाही. परंतु, सत्ताधारी आपल्या फायद्यासाठी निवडणुकांपुरता तरुणाईचा वापर करतात. तरुणाई व्यसनाच्या आहारी जात असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्नदेखील गंभीर होत आहे. हा प्रश्न सोडविण्यास सत्ताधारी अपयशी ठरत आहेत. कोणेतेही राजकारण न करता केवळ समाजहितासाठी, तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शेकाप काम करीत आहे. शेकापच्या महिला मेळाव्याने शिंदे गटाच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना आगामी निवडणुकीत अपयश येण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ विरोधी भावना ठेवून शिंदे गटातील काही मंडळी कायदा व सुव्यवस्था बिघविडण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरुणांची दिशाभूल करणाऱ्यांविरोधात चित्रलेखा पाटील यांनी आवाज उठविल्यानंतर त्यांच्याविरोधात बेताल वक्तव्य करून त्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न शिंदे गटातील कार्यकर्त्यांकडून होत आहे. ही बाब निंदनीय असल्याची प्रतिक्रिया महिलांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

पेझारी नाका ते पेझारी चेक पोस्टपर्यंत घोषणा देत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये अलिबाग पंचायत समितीच्या माजी सभापती विद्या म्हात्रे, शेकाप तालुका महिला आघाडी उपाध्यक्ष रोशनी मोकल, नागेश्वरी हेमाडे, भैरवी जाधव, तन्वी पाटील, संध्या पाटील, श्रेया केळकर, मनीषा रेळकर, श्रुती सुतार, राजश्री पाटील, स्नेहल पाटील, रितिषा पाटील, अनिता पाटील, वैशाली पाटील, सायली पाटील, पूजा गिरी, कीर्ती पाटील, सुमती पाटील, संगिता पाटील आदी महिला पदाधिकारी कार्यकर्त्या मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## पेट्रोल पंप सुरु करा

कारभारात अडकल्याने पेट्रोल पंपाचे काम पूर्ण होऊनही पंप सुरु होऊ न शकल्याने शेकाप कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी पेट्रोल पंपाच्या उद्घाटनाच्या मागणीचा बॅनर पंपावर लावून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

शहरे विकसित करताना सिडकोचे नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाले आहे. कामोठे नोडमधील नागरिक अनेक सुविधांपासून वंचित आहेत. येथील लोकसंख्या तीन लाखांच्या घरात पोहोचली आहे. त्याप्रमाणे वाहनांची संख्या दुपटीने वाढली आहे.वाहन चालकांना इंधन भरण्यासाठी कळंबोली, खारघर, खांदा कॉलनी येथील पंपावर जावे लागत आहे. यासाठी वेळ आणि पैसा खर्च होत असल्याने वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

अमोल शितोळे यांनी या परिस्थितीबाबत राजकीय भाष्य करणारा बॅनर लावून नागरिकांचे लक्ष वेधले आहे. सध्या फक्त ब्युटी पार्लर, साडीची दुकाने, केक शॉपचे उद्घाटन होत आहे. पंधरा वर्षे समस्या जैसे थेच आहे. कामोठेकरांना पेट्रोल पंपाचे उद्घाटन हवे, आता बदल हवा, पनवेलचा आमदार नवा, असा बॅनरवर उल्लेख करून राजकीय विरोधकांवर निशाणा साधला आहे.

**सेक्टर १८ भूखंड क्रमांक ४ इथे वर १०९९.२३ चौ.मी. जागेवर इंडियन ऑइलचा पेट्रोल पंप बांधून दोन वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. पनवेल महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र न दिल्याने पेट्रोल पंप सुरू होत नसल्याची चर्चा आहे.**

## सुधाकर घारे वाजवणार तुतारी?

उलथापालथ घडताना दिसत आहेत. १८९ कर्जत विधानसभा मतदारसंघात सध्या शिवसेना शिंदे गटाचे महेंद्र थोरवे हे आमदार आहेत. त्यांचा पक्ष महायुतीमधील प्रमुख घटक पक्ष असून, महायुतीमध्ये भाजप आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षदेखील आहे. परंतु, महायुतीमध्ये तिन्ही पक्ष या विधानसभा मतदारसंघात निवडणुकीची तयारी करीत आहेत.त्यामुळे तीनपैकी एकाच उमेदवाराला उमेदवारी मिळणार असल्याने सुधाकर घारे यांची राजकीय गोची होऊ शकते. परंतु, कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविण्यासाठी मागील अडीच वर्षे तयारी करीत असलेले सुधाकर घारे तुतारी हाती घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार यांना पराभूत करणे हा एकमेव उद्देश शिवसेना ठाकरे पक्षाचा आहे. हाच उद्देश महायुतीमधील सुधाकर घारे यांचादेखील आहे. त्यात सुधाकर घारे हे राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या गाठीभेटी घेत असल्याची चर्चा आहे. शरद पवार यांच्याकडून कर्जत मतदारसंघात तुल्यबळ उमेदवार मिळाल्यास कर्जत मतदारसंघ शिवसेना ठाकरे पक्षाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पवार पक्षाकडे खेचून घेतला जाऊ शकतो. त्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून सुधाकर घारे यांनी महाविकास आघाडीमध्ये प्रबळ दावेदार असलेले नितीन सावंत यांची भेट घेऊन कर्जत मतदारसंघातील राजकीय गणितांची चर्चा झाल्याची चर्चा आहे. मात्र, सुधाकर घारे यांच्याकडून दररोज वेगवेगळ्या स्तरावर महाविकास आघाडीचे दार ठोठावले जात आहे, अशी चर्चा सुरू आहे. पण, सुधाकर घारे यांनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला आणि कर्जत मतदारसंघ महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटला नाही तर अनेक अडचणी घारे यांच्यासाठी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे आयत्यावेळी मशाल हाती घेण्याची वेळदेखील येऊ शकते. त्यावेळी विद्यमान आमदारांचा पराभव आणि निवडून येण्याची क्षमता हाच एकमेव निकष महाविकास आघाडी वापरणार आहे. त्यामुळे नितीन सावंत यांच्या काहीशी पक्क्या समजल्या जाणाऱ्या उमेदवारीबद्दल संशय व्यक्त होऊ लागला आहे. मात्र, घारे यांनी खरोखर शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत काय? घारे आणि नितीन सावंत यांच्या भेटी झाल्या आहेत काय? उद्धव ठाकरे हक्काचा मतदारसंघ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडणार काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळायला आणखी काही दिवस लागणार आहेत.

## तरुणीवर अत्याचार

लग्नासाठी तगादा लावल्यानंतर सागर मिश्रा याने तिच्यासोबतचे लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला. तसेच त्याच्यासोबतचे तिचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर पीडित तरुणीने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

ता. रोहा हे त्यांच्या ताब्यातील हिरो होंडा कंपनीची पॅशन प्रो मोटारसायकल (एमएच ०६ बीसी १४०५) स्वतः मुंबई-गोवा महामार्गाने चालवीत घेऊन जात होते. दरम्यान, पोटणेर गावच्या थांब्याजवळ आले असता उजव्या बाजूकडील इंडिकेटर देऊन रस्त्याची खात्री करून पोटणेर गावाकडे वळत असताना पाठीमागून येणाऱ्या इंडीव्हर कार (क्र.एमएच ०२ ईई ७५२०) चालकाने पाठीमागून अतिवेगात येऊन मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात भागोजी मालू खैरे यांना गंभीर दुखापती होऊन त्यात त्यांचा मृत्यू होऊन मोटारसायकलचे नुकसान झाले. अपघातानंतर कारचालक पळून गेला. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात येऊन आरोपी कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दोडकुलकर करीत आहेत.

## अकृषिक कर पूर्णपणे माफ

नुकसान केल्यास आता दोन वर्षांचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद (पर्यटन) राज्यातील खेळाडूंसाठी पारितोषिक रक्कम वाढवली (क्रीडा विभाग) राज्यातील आणखी १०४ आयटीआय संस्थांचे नामकरण ( कौशल्य विकास) संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवणार (सामाजिक न्याय विभाग) लहान जलविद्युत प्रकल्पासाठी बांधा वापरा हस्तांतरण धोरण (जलसंपदा विभाग) कोकण पुणे विभागासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्या ( मदत व पुनर्वसन विभाग) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ( वैद्यकीय शिक्षण)राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणे (वैद्यकीय शिक्षण) जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ (अल्पसंख्याक विकास विभाग) महाराष्ट्र भूजलाशयीन मच्छीमार कल्याणकारी महामंडळ ( पदुम विभाग) आजरा तालुक्यातील वेळवट्टी, गवसे, घाटकरवाडी बंदिस्त पाईपलाईन टाकणार (मृद व जलसंधारण)बंजारा, लमाण तांड्यात ग्रामपंचायतसाठी लोकसंख्येची अट शिथिल (ग्रामविकास विभाग)कागल येथील सागावमध्ये नवीन शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय (वैद्यकीय शिक्षण विभाग) महाराष्ट्र सागरी मच्छिमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करणार (मत्स्य व्यवसाय विभाग) आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

## पेण भाजपामध्ये गृहकलह

परिषद विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांनाच उमेदवारी मिळावी म्हणून त्यांचे समर्थक सागर बंगल्याच्या पायऱ्या झिजवत आहेत, अशी चर्चा आहे. त्यामुळे वैकुंठावरील उमेदवार कोण? या गर्दीत भाजप पदाधिकारी संभ्रमात पडले आहेत. तर, तिघांमध्ये कोणाची बाजू घ्यायची, याबाबत पेणमध्ये चर्चा रंगत आहेत.

सौभाग्यईन येथे गुप्त मतदानामध्ये भाजपच्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांनी वैकुंठ निवासावर नाराजी दाखवली आहे. एकंदरीत, पेण विधानसभा मतदारसंघात भाजप पक्षश्रेष्ठीला वैकुंठावरील गृहकलह सोडविण्यास अपयश येत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सोगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, या आमचे अशिल १) स्नेहलता विष्णू मलानी आणि कुटुंबिय व २) शिला मिथू मलानी आणि कुटुंबिय यांच्या मालकीच्या व ताबेकब्जावहिवाटीत आहेत. त्या मिळकतींमध्ये आमच्या अशिलांव्यतिरिक्त इतर कुणाचीही मालकी व कब्जा नाही. आमचे अशिल गेले ३० वर्षांपासून त्या मिळकतीचे मालक व ताबेदार असून त्या त्यांच्या अखंड वहिवाटीत व कसवणुकीत आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| सोगांव | २९४/१ | १४-११-०० | ५२.०० |
| सोगांव | २९४/२ | ०-०५-०० | १.०६ |

सदरच्या मिळकती या पुर्वी श्री.शशिकुमार द्वारकानाथ वैद्य यांचे मालकीच्या व ताबेकब्जावहिवाटीत होत्या. त्या त्यांनी आमचे अशिलांस ता. १०/८/१९९४ रोजीच्या व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. ५५२/१९९४ कडे नोंदविण्यात आलेल्या खरेदीखताद्वारे मोबदला घेऊन कायम मालकी हक्काने विकत दिलेल्या आहेत व त्यांचे ताबेकब्जावहिवाटीत दिलेल्या आहेत. दोन्ही मिळकती आमचे अशिलांचेच ताबेकब्जावहिवाटीत आहेत, इतकेच नव्हे तर त्या मिळकतीमध्ये एक जूने घर असून सदर मिळकतींचे आमचे अशिलांनी नेमलेले केअर-टेकर श्री. बाळाराम गोविंद थळे, रा.झाळखंड, पो. कामार्ले, ता.अलिबाग, जि. रायगड हे त्या घरामध्ये रहात आहेत.

आमचे अशिलांचे अलिकडेच असे निदर्शनास आले आहे की, श्री. शशिकुमार द्वारकानाथ वैद्य हे मृत्यू पावले असून त्यांचे मृत्यू पश्चात तब्बल १७ वर्षांनंतर त्यांचे वारसांनी फेरफार नं. १२८८ द्वारे मौजे सोगांव गट नं. २९४/२ या मिळकतीचे हक्कनोंदपत्रकी त्यांची नावे भोगवटादार म्हणून बेकायदेशीरपणे लावून घेतली आहेत. त्याबाबत योग्य ती कायदेशीर दिवाणी आणि फौजदारी कारवाई आमचे अशिल करीत आहेत.

मात्र मौजे सोगाव गट नं. २९४/२ ही मिळकत ७/१२ सदरी भोगवटादार म्हणून त्यांचे नावे आहे या गोष्टीचा गैरफायदा घेऊन सौ. मंगल विजय केंकरे (पुर्वश्रमीची मंगल शशिकुमार वैद्य), विदूला विकास मुणगेकर (पुर्वाश्रमीची विदूला शशिकुमार वैद्य), अरूण शशिकुमार वैद्य व अतुल शशिकुमार वैद्य हे सदर मिळकतीमध्ये खोडसाळपणे त्रयस्थ हक्कहितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे.

तरी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येत आहे व सावध करण्यात येत आहे की, सौ. मंगल विजय केंकरे, विदूला विकास मुणगेकर, अरूण शशिकुमार वैद्य, व अतुल शशिकुमार वैद्य यांचेबरोबर मौजे सोगांव गट नं. २९४/२ एकूणक्षेत्र ० हे. ५ आर, आकार १ रूपये ०६ पैसे या मिळकतीसंदर्भात कुणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा अथवा तत्सम व्यवहार ठरवू नये व करार-मदार करू नयेत. तसा कोणताही व्यवहार ठरविल्यास व करार-मदार केल्यास तो बेकायदेशीर होईल व आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही व सर्व संबंधितांवर आमचे अशिल योग्य ती कायदेशीर दिवाणी आणि फौजदारी कारवाई करतील, तसेच त्या मिळकतींमध्ये कुणीही अनधिकृतपणे प्रवेश अथवा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करू नये, तसे केल्याचे आमचे अशिलांच्या निदर्शनास आल्यास आमचे अशिल संबंधितांवर देखील कायदेशीर दिवाणी आणि फौजदारी कारवाई करतील हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख :५/१०/२०२४

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर ब्राम्हणआळी,
अलिबाग- रायगड ४०२२०१



### MAHATRANSCO — SRM E-TENDER NOTICE (3[III] CALL)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/ EHV (O &M ) /DIVN/ MHD/Tech/III[rd] Call Tender No.36/2024-25 Dtd.04.10.2024. RFx No.7000033087 | **Sub:-III[rd] Call** for SRM E-Tender for providing outsources skilled manpower at various locations under EHV (O&M Dn. Mahad for the period 01.10.2024 to 31.03.2025. | **Rs.** 9,19,185/- **(Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.9192/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 04.10.2024 @ 00:00 hrs to 10.10.2024 @23:59 Hrs for above tender

for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer EHV(O&M) Dn. Mahad**



### ग्रामपंचायत पहेल, ता. माणगाव, जि. रायगड

ग्रामपंचायत पहेल १५ व्या वित्त आयोग व इतर योजनेअंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ निधी अंतर्गत मधील खालील प्रमाणे कामांसाठी दिनांक १०-१०-२०२४ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सीलबंद दरपत्रक मागविण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १) | रा.जि.प.शाळा पहेल शाळेला लादी बसविणे | १०००००/- | १००० | २०० |
| २) | शाम बाळ खराडे यांच्या घराशेजारील भिंत बांधणे व ओहोलाला संरक्षण भिंत बांधणे | ९०९००/- | ९०९ | २०० |
| ३) | रा.जि.प.शाळा पहेल शौचालय दुरुस्ती | ५००००/- | ५०० | २०० |

**अटी आणि शर्ती**
१. दरपत्रके प्रक्रियेच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. अंतिम तारखेस दि. १०-१०-२०२४ रोजी सकाळी ११.वा. नंतर आलेली दरपत्रके घेतली जाणार नाही.
३. प्राप्त दरपत्रके दि. ११-१०-२०२४ रोजी दुपारी १२ वा ग्रामपंचायत पहेल कार्यालयात उपस्थिता सक्षम सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. नामंजूर दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. व बिलाची रक्कम ग्रामपंचायतीकडील तरतुदीनुसार अदा करण्यांत येईल.
४. साहित्य उत्तम दर्जाचे (आयेसाय/आयएसओ मार्क प्रमाणित) असावे. पुरवठादार जीएसटी नोंदणीकृत असावा.
५. कोणत्याही एक अथवा अनेक दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा राहील.

सही/-
**ग्रामसेवक**
**सौ. श्रेया सतीश ढेपे**
**ग्रामपंचायत पहेल**

सही/
**सरपंच**
**सौ. करिश्मा प्रसाद मांजरे**
**ग्रामपंचायत पहेल**



### महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :-alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :-(०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र.२९ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर : http://mahatenders.gov.in. येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | चिखलगांव ते करंजाई आदिवासीवाडी रस्ता तयार करणे, ता. सुधागड जि. रायगड | १,२४,८८,१६०/- |
| २) | राबगांव आदिवासीवाडी ते जांभुळमाळ रस्ता तयार करणे, ता. सुधागड जि. रायगड | १,२२,५७,७९९/- |
| ३) | घोडगांव ते वासरबोडन रस्ता तयार करणे, ता. सुधागड जि. रायगड | १,००,४६,५५३/- |
| ४) | सिध्देश्वर (खु) ते आपटवणे आदिवासीवाडी रस्ता तयार करणे, ता. सुधागड जि. रायगड | १,२२,४०,१५६/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ४.१०.२०२४ (स.१०.००) ते दिनांक ११.१०.२०२४ (सं.१८.०० )

ई-निविदा उघडणे :- दिनांक १४.१०.२०२४ (दु. ३.०० वा. ) ( अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई )

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. : http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in.
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१
दिनांक :- २६.०९.२०२४

सही/-
**(ज.ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग, अलिबाग,**
**जि. रायगड**



### जाहिरात

**उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे**
**वैद्यकिय अधिकारी, गट-ब यांची कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१)/ सेवा-३, दि. ०३/१२/२०१८ व शासन निर्णय क्र. संआसे-२०२२/प्र.क्र.१९२/ सेवा-१ (शिकाना), दि २७/१२/२०२२ तसेच शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१) सेवा-३ दि.०७.०३.२०२४ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, ठाणे परिमंडळांतर्गत जिल्हानिहाय विविध प्राथमिक आरोग्य केंद्रातील महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा, गट-ब यांची १६ पदे वैद्यकिय अधिकारी, गट-ब, बी. ए. एम. एस. (B.A.M.S.) म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | ठाणे | ८ |
| २ | पालघर | ६ |
| ३ | रायगड | २ |
| | एकुण | १६ |

१) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर बी. ए. एम. एस. अर्हताधारक नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील. २) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिनेकरीता असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्याप्रमाणे म.ना.से. (रजा) नियम लागु राहणार नाही. तसेच ते विमा योजना भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.
३) सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही.
४) कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.
५) केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा ज्येष्ठता व कोणत्याही प्रकारच्या सेवा विषयक बाबीसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.
६) निवड झालेल्या कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.
१) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.
२) कामामध्ये निष्काळजीपणा.
३) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.
४) कामकाज अकार्यक्षम असणे. सेवेची कर्तव्य व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळणे.
५) गैरवर्तन/ गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे.
६) कार्यरत पदावर नियमित उमेदवार नियुक्ती झाल्यास.
७) अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
८) निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मुख्यालयात राहणे बंधनकारक असेल. तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

टिप- पात्र उमेदवारांची यादी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (ठाणे, पालघर, अलिबाग-रायगड) यांच्या कार्यालयाकडुन प्रसिध्द करण्यात येईल.

सही/-
**(डॉ. अशोक नांदापुरकर)**
**उपसंचालक,**
**आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे.**

दिनांक-०३-१०-२०२४
स्थळ- ठाणे

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/१६६**

**निवडक**

## चार लाखांची फसवणूक

**पनवेल :** स्टॉक ट्रेडिंग करण्यासाठी चार लाख ८५ हजार रुपये घेऊन ते परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नेहा चव्हाण यु ट्यूबवर स्टॉक एक्सचेंजबाबत माहिती घेत असताना त्यांना एक लिंकद्वारे ११ हजार रुपये भरण्यास सांगितले. त्यानंतर चार लाख ३८ हजार रुपये बँक खात्यावर पाठवण्यात आले. गुंतवलेले पैसे परत मिळण्यासाठी संपर्क साधला असता फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी गुन्हा दाखल केला.

## मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**पनवेल :** मोटरसायकलवरून आलेल्या चोरांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून ते पळून गेले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अंजली सक्सेना आणि त्यांचे पती हे प्रशांत कॉर्नर येथे मिठाई आणण्यासाठी गेले होत्या. मिठाई घेऊन येत असताना टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल येथे झाडाच्या नर्सरीजवळ आले असता एक मोटरसायकल पाठीमागून येऊन त्यांनी ती आडवी लावली. यावेळी मागे बसलेल्या इसमाने सक्सेना यांचे मंगळसूत्र खेचून ते पळून गेले.

## जुगारावर कारवाई

**पनवेल :** तीन पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्यांवर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला. केळवणे गाव प्राथमिक शाळेच्या मागे एका घरामध्ये पत्त्याचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी जुगार खेळणारे इसम पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. व त्यांची अंग झडती घेतली असता त्यांच्याकडे २२ हजार ८०० रुपये सापडले असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## दोन दुचाकींची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात फुटपाथवर उभ्या केलेल्या दोन दुचाकी वाहनांची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे.रेल्वे स्टेशन येथील पे अ‍ॅण्ड पार्क गाड्यांनी भरलेली असल्याने दुचाकी वाहने तेथे परिसरात असलेल्या फुटपाथवर उभी करून कामानिमित्त निघून जातात. याचा फायदा घेत चोरट्यांनी सदर ठिकाणची दोन दुचाकी चोरुन नेल्या आहेत. तरी वाहन मालकांनी आपले वाहन सीसीटीव्ही कॅमेऱ्यासमोर त्याचप्रमाणे हॅण्डल लॉक व टायर लॉक करावे, असे आवाहन केले आहे.

## ‘जप्त वाहनांची ओळख पटवा’

**पनवेल :** कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनांची ओळख पटवून ती मुळ मालकाने परत नेण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी केले आहे. कामोठे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ३१ वाहने त्यात दुचाकी व चारचाकी वाहनांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेली आहेत. नमूद वाहनांच्या मालकांचा शोध तपास करण्यात आला असता कोणतेही वाहन मालक अद्याप मिळून आलेले नाहीत.

**युनेस्को पथकाने केली पाहणी**

# किल्ले रायगड होणार वर्ल्ड हेरिटेज

**। रायगड । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांनी साकारलेल्या हिंदवी स्वराज्याची राजधानी राहिलेल्या किल्ले रायगडाचा समावेश प्रतिष्ठित जागतिक वारसा स्थळांच्या यादीत करण्याच्या हालचाली अत्यंत वेगाने सुरु आहेत. यासाठी नामांकन मूल्यांकन प्रक्रियेचा एक भाग म्हणून गुरुवारी(दि.९) युनेस्कोच्या शिष्टमंडळाने किल्ले रायगडाला भेट देवून पाहणी केली.

या पथकामध्ये आंतरराष्ट्रीय तज्ञ हेवान्ग ली, सह संचालक जागतिक वारसा (एएसआय) मदन सिंग चौहान, महाराष्ट्र शासन पुरातत्व विभाग संचालक सुजित उगले, उपसंचालक हेमंत दळवी, डॉ शुभा मजुमदार यांचा समावेश होता. पथकाने कुशावर्त तलाव, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज समाधी, हत्तीखाना, भवानी मंदिर आणि टोक, टकमक टोक, या महत्त्वपूर्ण ठिकाणासह विविध ऐतिहासिक खुणांना भेट दिली.

तसेच या पथकाने किल्ल्याचा इतिहास आणि सद्यस्थितीबद्दल तपशीलवार माहिती घेतली. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी किल्ल्यातील हवामान, वनस्पती आणि इतर संबंधित पर्यावरणीय घटकांवर चर्चा केली. तसेच या किल्ल्याच्या संवर्धनासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने घेतलेले निर्णय, सुरु असलेली कार्यवाही तसेच पर्यटन विकासासाठी केलेल्या उपाययोजना याबाबत माहिती घेतली. तसेच गडाच्या जतनामध्ये प्रशासन, स्थानिक नागरिकांच्या सहभागाविषयी माहिती दिली. युनेस्को टीमने देखभाल आणि संवर्धनासाठी संभाव्य सुधारणांबद्दल त्यांची मते मांडली. भेटीदरम्यान, शिष्टमंडळाने स्थानिक प्रतिनिधी आणि गावकऱ्यांशी देखील संवाद साधला. यावेळी रायगड किल्ला पाहण्यासाठी आलेल्या नवोदय विद्यालय निजामपूरच्या विद्यार्थ्यांशी देखील या पथकाने संवाद साधला.





यावेळी प्रांत डॉ ज्ञानोबा बाणापुरे, प्राधिकरणच्या सलोनी साळुंखे, शिखा जैन, पुरातत्व विभागाचे शेख, रायगड पुरातत्व विभागाचे दिवेकर, वरूण भामरे, तहसीलदार महेश शितोळे, रोप वे प्रतिनिधी राजेंद्र जोग, माजी सरपंच पाचाड राजेंद्र खातू, उपसरपंच संदीप ढवळे, गाव कमिटी सदस्य हिरकणीवाडी मनोहर अवकीवकर आदीनी चर्चेत सहभाग घेतला.

**देशातील सहा किल्ले**

जागतिक वारसा स्थळामध्ये भारतातील सहा किल्ल्यांचा समावेश आहे. यामध्ये चित्तोड किल्ला, कुंभलगड किल्ला, रणथंबोर किल्ला, गाग्रोन किल्ला, अंबर किल्ला, आणि जैसलमेर किल्ला अशी या किल्ल्यांची नावे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारसाशी जोडलेल्या १२ निवडक किल्ल्यांपैकी दुर्गराज रायगडाची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्याचे विचाराधीन आहे. या समावेशामुळे रायगड किल्ल्याला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळेल आणि जागतिक पर्यटक आकर्षित होतील, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल असा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी व्यक्त केला.

## घटस्थापनेच्या मुहूर्तावर आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

केळ्याचे माल अभिनव सेवा सहकारी संस्था मर्या.चिरनेर यांच्या वतीने सार्वजनिक नवरात्रौत्सवाचे आयोजन यावर्षी करण्यात आले आहे.शारदा नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून गुरुवारी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अतिदुर्गम भागातील केळाचा माल या आदिवासी वाडीवरील महिलांना अनंत नारंगीकर यांच्या कुटुंबियांच्या वतीने साड्यांचे वाटप करण्यात आले.

ग्रामदैवत - आदिशक्तीचा जागर सोहळा तथा शारदा नवरात्रौत्सव शहर तसेच ग्रामीण भागात मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जात आहे.यावर्षी शारदा नवरात्रौत्सव हा गुरुवारी ३ ऑक्टोबर रोजी आल्याने सालाबादप्रमाणे यंदाही नवरात्रौत्सव मंडळाने आप आपल्या शहरात,गाव परिसरात घटस्थापनेच्या मुहूर्तावर श्री दुर्गादेवी, महिषासुरमर्दिनीची मोठ्या भक्तिभावाने पुजा अर्चा करून प्राणप्रतिष्ठा केली आहे.यामुहूर्ताचे औचित्य साधून चिरनेर केळाचा माल या अतिदुर्गम भागातील आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून अनंत नारंगीकर यांच्या कुटुंबियांनी हाती घेतले.

यावेळी केळ्याचे माल अभिनव सेवा सहकारी संस्थचे पदाधिकारी दत्ता कातकरी, अशोक कातकरी, सुरेश कातकरी, रोहित कातकरी, श्रीकांत कातकरी, राम कातकरी, राम कातकरी यांच्या उपस्थितीत कविता अशोक कातकरी , वैशाली कातकरी, किर्ती रोहित कातकरी, बेबी कातकरी, अमिषा कातकरी, देवकी कातकरी, लता कातकरी, गुलाब कातकरी, रुपाली अजय कातकरी सह इतर आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

## शारलोट तलाव यंदाही गाळातच

**। माथेरान । वार्ताहर ।**

मागील दहा वर्षांपासून सफाईच्या प्रतीक्षेत असलेला माथेरानचा शारलोट तलाव यंदाही गाळातच राहिला असून तलावाची स्वच्छता आणि सफाई आता थेट पुढल्या वर्षी होणार असल्याचे बोलले जात आहे.तलावाची सफाई आणि परिसर स्वच्छतेबाबत आग्रही असलेले संतोष कदम यांनी यासाठी उपोषण देखील केले होते. त्यांनी गावाच्या महत्वाच्या प्रश्नावर मुख्याधिकारी यांची भेट घेऊन निवेदन देऊन याबाबत विचारणादेखील केली होती.

माथेरान या पर्यटनस्थळाचा शोध ब्रिटिशांनी लावला. त्यावेळी त्यांनी भविष्याचा विचार करीत नियोजनबद्ध पद्धतीने शारलोट तलावाची बांधणी केली. तेव्हापासून शारलोट तलावाच्या पाण्याचा उपयोग माथेरानकरांना पिण्यासाठी होऊ लागला आहे. तिन्ही बाजूनी उतार असल्यामुळे पावसाचे पाणी वाहून येथे तलावात येते. पावसाचे पाणी तलावात वाहून येताना माती, झाडाझुडपांची लाकडे, पर्यटकांनी टाकलेल्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या गाळरुपात या तलावात साचून राहतात. पूर्वी प्रत्येकवर्षी या शारलोट तलावाची सफाई पावसाळ्यात केली जात असे. मात्र, मागील दहा वर्षांपासून या तलावाची सफाई झालेली नाही. यासाठी निसर्ग पर्यटन संघटना माथेरानचे अध्यक्ष संतोष कदम यांनी तलावाची सफाई व स्वच्छतेसाठी उपोषण केले होते.

संतोष कदम यांनी माथेरान पालिका मुख्याधिकारी यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी नगर पालिकामुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सांगितले की, शारलोट तलावासाठी शासनाने ४.१३ कोटी निधी उपलब्ध करून दिला असून या निधीतून बंधाऱ्याची सुरक्षितता तलावाची सफाई, स्वच्छता तसेच परिसराचे सुशोभीकरण याकरिता निधी वापरला जाणार असून याबाबत सनियंत्रण समितीसोबत चर्चा करून त्यांची यासाठी परवानगी घेऊन कामाला सुरुवात होईल. यामुळे आता शारलोट तलावाची सफाई ही पुढल्यावर्षी होणार हे निश्चित झाले असून यंदाही तलाव गाळमुक्त होणार नसल्याने माथेरान पर्यटनस्थळाला ऐन पर्यटन हंगामात पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

## अलिबाग महाजन हॉलचा नवरात्रौत्सव

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग शहरातील बाजारपेठेच्या महाजन हॉलमध्ये गुरूवारी (दि.३) घटस्थापना विधी संपन्न झाला. या मंडळाची स्थापना अलिबागमधील गुजराती समाजाच्या पुढाकाराने झाली असून या वर्षी मंडळाचे ६४वे वर्ष आहे. मंडळाचे अध्यक्ष मयूर डाबी (बाडा) असून मंडळाच्या समिती सदस्यांमध्ये सुरेश जैन, राजेश छेडा, अंकित भानुशाली, नीरज भानुशाली, सैय्यम संघवी आणि प्रथमेश गांधी यांचा समावेश आहे. घटस्थापनेची पूजा बाजारपेठेतील जितेंद्र नरेंद्र मेहता आणि कृपा जितेंद्र मेहता या दाम्पत्याच्या हस्ते करण्यात आली. दरवर्षी शेकाप रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील या मंडळाच्या विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित राहतात. याशिवाय, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी नगरसेवक अनिल



चोपडा देखील या सोहळ्याला हजेरी लावतात.



रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# मराठीचा ‘जीवनगौरव’

अखेर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी याबाबत निर्णय घेतला. मुळात एखाद्या भाषेला असा दर्जा देण्याचे अंतिम अधिकार सरकारकडे असावेत हाच एक मोठा विनोद आहे. साहित्य अकादमी किंवा भाषाविषयक संस्थांची शिफारस यात ग्राह्य मानली जाते खरी. पण अंतिम निर्णय कधी व कसा घ्यायचा हे सर्वस्वी सरकार ठरवते. त्यानुसार, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका तोंडावर असताना मोदी सरकारने मराठीच्या अभिमान्यांना खोटी खोटी शाबासकी दिली आहे. भाजप आणि महायुतीसाठी महाराष्ट्राची निवडणूक जीवनमरणाचा प्रश्न झाली आहे. आपली परिस्थिती नाजूक आहे हे त्यांना ठाऊक आहे. त्यासाठी एकेका दिवसात शेकडो शासन निर्णयांचे अध्यादेश काढले जात आहेत. विविध जातींतील थोर पुरुषांच्या नावाने महामंडळे स्थापन केली जात आहेत. मराठीला अभिजात भाषा ठरवल्याने बहुसंख्य गरीब समाजाला फरक पडणार नाही. पण मध्यमवर्गाला थोडे चुचकारता येऊ शकेल. त्यातून काही मते हाताला लागली तर पाहावीत असा हा हिशेब आहे. या निर्णयासाठी अनेकांचा का आटापिटा का चालू होता याचे इंगितही यातच आहे. असा दर्जा दिल्यानंतर सरकार आता काहीशे कोटी रुपयांचे अनुदान या भाषेसाठी देईल. त्यातून काही संस्था व पदे निर्माण होतील. काही जणांची वर्णी त्यात लागू शकेल. आजपासून मराठी अभिजात ठरली याचा सामान्य माणसाच्या जीवनावर काहीही परिणाम होणारा नाही. कालही तो तीच मराठी बोलत होता व आजही तीच बोलणार आहे. त्याला मराठी शिकणे, लिहिणे, वाचणे यापासून कोणीही रोखलेले नाही. आता काही लोकांचा स्वाभिमान सुखावेल व राणा भीमदेवी भाषणे करायला त्यांना अधिक जोर येईल. पण त्यापेक्षा, सरकारी सरकारी पातळीवर संशोधन, अभ्यास इत्यादींसाठी सरकारकडून थोडे पैसे मिळाले व ते नीट वापरले गेले तर त्यातून मराठीचे थोडेफार भले होऊ शकेल.

## पुराव्यांची लढाई

मुळात २००४ मध्ये केंद्र सरकारने ही अभिजात भाषांची टूम काढली. त्यात तमीळ, मल्याळम, ओडिया, तेलुगु यांचा सहज समावेश झाला. पण मराठी आणि बंगाली या मागे पडल्या. गंमत अशी की, बंगालीमध्ये लिहून रवीन्द्रनाथ टागोरांना नोबेल पारितोषिक मिळाले आणि बंगाली सिनेमे काढून सत्यजित रे यांना जगातील उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून जीवनगौरव मिळाला. बंगाली भाषेतील साहित्यातून सर्व भाषात भाषांतरे झाली. शरश्चंद्रांच्या कादंबऱ्या, रवीन्द्रनाथांच्या कविता इत्यादी सर्वदूर पोचल्या. दिल्लीत बंगाली अधिकारी, बुध्दिमंत इत्यादींची मोठी लॉबी आहे. असे असूनही ती मागे राहिली. अभिजात होण्यासाठी भाषा किती वर्षे जुनी आहे हा एक मापदंड होता. मराठी ही हजारपेक्षा अधिक वर्षे जुनी नाही असा आक्षेप होता. शिवाय तिच्यात खूप जुने असे अभिजात साहित्य किती आहे याबाबतही काहींच्या शंका होत्या. त्याला उत्तर म्हणून अनेकांनी अनेक पुरावे दिले. त्यामुळे याला एखाद्या दिवाणी खटल्याचे स्वरुप प्राप्त झाले. पुरावे, त्यावर आक्षेप, अधिक पुरावे असे चक्र चालू राहिले. पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारने २०१३ मध्ये पहिल्यांदा याबाबतचा प्रस्ताव केंद्राला पाठवला. तेही राजकारणच होते. २०१४ च्या निवडणुकांवर डोळा ठेवून हे घडले होते. नंतर रंगनाथ पठारे यांची समिती नेमण्यात आली. साहित्य संमेलनामध्ये ठराव झाले. साहित्य अकादमीने अनुकूलता दर्शवली. पण तरीही मोदी सरकारकडे हा प्रस्ताव जवळपास सात-आठ वर्षे पडून होता. ते बहुदा अशाच एखाद्या निवडणुकांची वाट पाहत होते. तो मोका यंदा साधला गेला. आता याची भरपूर जाहिरातबाजी होईल. मराठीला जणू एखाद्या पिंजऱ्यातून सोडवून आणली अशा बाता केल्या जातील. एक बरे होईल. की या निवडणुकीनंतर हा विषय संपून जाईल. साहित्य संमेलनात व अन्यत्र याबाबतच्या निरर्थक चर्चा व आरोप-प्रत्यारोप थांबतील.

## कौतुक सोहळे नकोत

राजकारण्यांसाठी मराठी हा दिखाऊ, प्रचाराचा विषय झालेला आहे. सामान्य माणसाचे या भाषेवर प्रेम आहे. पण रोजच्या जगण्यांच्या चिंतांमध्ये तो इतका बुडालेला आहे की त्याला भाषेविषयी चिंतन करायचा अवसर उरलेला नाही. त्यामुळे मराठीला भले अभिजाततेची पैठणी लाभली असली तरी ती घालून मिरवण्याइतकी तिची प्रकृती ठीक आहे का याचा विचार व्हायला हवा. आज मुंबई या राजधानीत जेमतेम वीस टक्के मराठी बोलणारे शिल्लक उरले आहेत. त्यातही बहुतेक पालकांची मुले आता इंग्रजी शाळांमध्ये शिकतात. अन्य महाराष्ट्रात याहून वेगळी अवस्था नाही. इंग्रजी शाळांचे वेड अगदी खेड्यापाड्यात पोचले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला ६५ वर्षे होत असतानाच मराठी शाळा जगवा असे आंदोलन करावे लागते यातच सारे काही आले. हे असेच चालू राहिले तर येत्या एक-दोन पिढ्यांमध्ये लिखित मराठी नष्ट होईल. कुटुंबांमध्ये बोलण्यापुरती मराठी भाषा शिल्लक राहील. त्यातही इंग्रजी शब्दांची व वाक्यांची इतकी भेसळ असेल की तिला मराठी का म्हणावे असा प्रश्न पडेल. आज मराठी टीव्ही मालिका, चित्रपट, नाटके यामध्ये काम करणारे कलावंत, तसेच मराठीत लिहिणारे लेखक यांच्या मुलाखती पाहा. त्या भयंकर धेडगुजरी भाषेत असतात. मराठीत नवे कसदार साहित्य निर्माण होण्याचा वेग मंदावला आहे. नवे शब्द, नव्या कल्पना येणे थांबले आहे. ही स्थिती सरकार किंवा राजकारणी बदलू शकत नाहीत. हा भांडवलाचा रेटा आहे. आपले बाथरूम धुणाऱ्या किंवा गाडी चालवणाऱ्या नोकरांनीही किमान इंग्रजीची तोंडओळख असावी ही इथल्या धनिकांच्या अमेरिकाळलेल्या बाळांची गरज आहे. त्यासाठी खेडोपाडी मराठीचा गळा आवळून इंग्रजीचा संसार थाटण्यात आला आहे. यात पुन्हा खासगी भुरट्या शिक्षणचालकांचे धंद्याचे हिशेब आहेत. अभिजाततेचा दर्जा मिळाला ही आनंदाची गोष्ट आहे. पण त्याबद्दल एकमेकांचे अभिनंदन करीत राहणे मूर्खपणाचे आहे. ज्यांचे हातपायही चालत नाहीत अशा कलाकारांना जीवनगौरव किंवा पद्म पुरस्कार देण्याची आपल्याकडची पध्दत आहे. तेच मराठीच्या बाबतीत घडत नाही ना हे पाहायला हवे. मराठीला वाचवायला हवे.

विचार

# जल्लोषपर्व आणि आर्थिक पडसाद

*आपल्याकडे सणवार जितका सांस्कृतिक जोश घेऊन येतो, तितकीच आर्थिक विश्वातही मोलाची उलाढाल होते. सध्या ती जाणवू लागली असतानाच लोक लॉटरीमध्ये पुन्हा नशीब आजमावयला लागल्याचे चित्र आहे. दरम्यान, येत्या दोन महिन्यांमध्ये देशभरात तब्बल ३५ लाख विवाह होणार असल्याची बातमी आहे. आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे अलिकडे चांदीला सोन्यापेक्षा जास्त झळाळी लाभली आहे.*



**महेश देशपांडे**

देशात सणासुदीचा हंगाम सुरु झाला असून खदेरीच्या उत्साहामध्ये भर पडू लागली आहे. सणवार जितका सांस्कृतिक जोश घेऊन येतो, तितकीच आर्थिक विश्वातही मोलाची उलाढाल होत असते. याच सुमारास लोक लॉटरीच्या क्षेत्रामध्ये पुन्हा जोमाने नशीब आजमावयला लागल्याचे चित्र आहे. दरम्यान, येत्या दोन महिन्यांमध्ये देशभरात तब्बल ३५ लाख विवाह होणार असल्याची माहिती समोर आली आहे. आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे अलिकडच्या काळात चांदीला सोन्यापेक्षा जास्त झळाळी लाभली आहे.

सणासुदीचा हंगाम यंदा दुकानदार आणि किरकोळ विक्रेत्यांसाठी चांगल्या भेटवस्तू घेऊन येणार आहे. यंदाच्या सणासुदीमध्ये खरेदीसाठी लोकांमध्ये उत्साह असल्याचे सांगितले जात आहे. एका सर्वेक्षणात या विषयावर लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सणासुदीच्या हंगामात खरेदीचा उत्साह वाढला आहे. त्यामुळे यंदाच्या सणासुदीमध्ये शहरांमध्ये बाजारपेठ भरपूर फुलण्याची अपेक्षा आहे. सर्वेक्षणानुसार सणांच्या या हंगामामध्ये भरपूर खरेदी पहायला मिळणार आहे. स्थानिक मंडळांच्या सर्वे क्षणानुसार भारतातील अनेक कुटुंबे या वेळी विविध सणांमध्ये सरासरी दहा हजार रुपयांची खरेदी करू शकतात. खरेदीदार ऑनलाइन खरेदीपेक्षा बाजारपेठेत जातील आणि दुकानांमधून खरेदीला प्राधान्य देतील, असेही या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे. यासाठी सर्वेक्षणात एकूण ४९ हजार कुटुंबांना प्रश्न विचारण्यात आले. यंदाच्या सणांच्या काळात लोक कोणत्या पॅटर्नची खरेदी करणार आहेत, याची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हे सर्वेक्षण भारतातील ३४२ विविध शहरांतील शहरी जिल्ह्यांमध्ये करण्यात आले. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या टियर १ शहरांमधील ४४ टक्के आणि टियर २ शहरांमधील ३४ टक्के लोकांनी ते सणासुदीच्या काळात खरेदीसाठी उत्सुक असतात, असे सांगितले. टियर ३, ४, ५ शहरी जिल्ह्यांमधील लोकांनीही कमी-अधिक प्रमाणात असेच संकेत दिले आणि यंदा खरेदीला खूप उत्साह असेल, असे सांगितले. प्रत्येक दोन कुटुंबांपैकी एकाने ते या वर्षी खरेदीवर अधिक पैसे खर्च करतील, असेही सांगितले.

आणखी एक लक्षवेधी बातमी आली आहे लॉटरी उद्योगामधून. लॉटरी हा नशिबाचा खेळ आहे आणि जगभरातील लोक त्यामध्ये आपले नशिब आजमवतात. आपल्या आजूबाजूला अनेक लोक लॉटरी काढताना दिसतात. देशात काही ठिकाणी सरकार लॉटरी चालवते तर काही ठिकाणी खासगी संस्थांकडून चालवली जाते. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर लॉटरी चालवली जाते. लोकांना एका झटक्यात कोट्यधीश बनवणाऱ्या लॉटरीचा इतिहास जुना आहे. अलीकडच्या काळात त्यात लोकांचा रस मोठ्या प्रमाणात वाढला आहे. १३ राज्यांनी लॉटरीला अधिकृतपणे मंजुरी दिली आहे. त्यामुळे लॉटरी आता एक प्रमुख कायदेशीर व्यवसाय बनला आहे. या राज्यांमध्ये केरळ, आसाम, अरुणाचल प्रदेश, गोवा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, पंजाब, सिक्कीम आणि पश्चिम बंगालचा समावेश आहे, तर कर्नाटक आणि तामिळनाडूसह अनेक राज्यांमध्ये लॉटरीवर बंदी घालण्यात आली आहे. २०१५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानंतर लॉटरी खेळण्यास परवानगी द्यायची की नाही हे राज्य स्वतः ठरवते. भारतात लॉटरी बऱ्याच काळापासून खेळली जात असली, तरी अधिकृतपणे लॉटरी सुरू करणारे केरळ हे पहिले राज्य होते. केरळ राज्य सरकारने १९६७ मध्ये लॉटरी सुरू केली. लॉटरी एखाद्याला कोट्यधीश करू शकते. लॉटरीचे तिकीट सहसा कमी किमतीत उपलब्ध असते आणि त्यात एक विशेष क्रमांक किंवा कोड असतो. लॉटरी ड्रॉ नियोजित दिवशी आयोजित केले जातात. त्यात निवडलेल्या क्रमांक किंवा कोडसह तिकिटे जाहीर केलेली असतात. जिंकल्यानंतर तिकीटधारकाला मिळणारी बक्षिसाची रक्कम लाखांमध्ये असू शकते.

सणासुदीचे दिवस संपल्यानंतर संपूर्ण देशात लगीनसराई सुरू होणार आहे. भारतात दर वर्षी लाखो तरुण-तरुणी लग्नबंधनात अडकतात. याच लग्नांमुळे अनेक लोकांची भरभरून कमाई होते. या वर्षी अवघ्या दोन महिन्यांमध्ये तब्बल ३५ लाख लग्नकार्ये होणार आहेत. म्हणजेच या दोन महिन्यांमध्ये लग्नाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणार आहे. याच काळात सोन्याचा भावही चांगलाच वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ४.२५ लाख कोटी रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. आपल्या मुलाचे लग्न मोठ्या धामधुमीत व्हावे यासाठी पालक वारेमाप पैसे खर्च करतात. आपले लग्न थाटामाटात झाले पाहिजे, अशी प्रत्येक तरुण, तरुणीची इच्छा असते. त्यासाठी त्यांचे अनेक वर्षांपासून नियोजन सुरु असते. या वर्षी नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यात तब्बल ३५ लाख लग्न होणार आहेत. तसेच या लग्नांमध्ये एकूण ४.२५ लाख कोटी रुपयांची उलाढाल होणार आहे. भारतात दर वर्षी साधारण एक कोटी विवाह होतात. मोठी आर्थिक उलाढाल होणारे हे चौथे मोठे क्षेत्र असल्याचे म्हटले जाते. लग्नामुळे अनेकजण कर्जबाजारी होत असतात. याच काळात सेवा, व्यापार, वस्त्रोद्योग यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठी उलाढाल होते. सरकारने सोन्यावरील आयात शुल्क १५ टक्क्यांवरुन सहा टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. त्यामुळेच नोव्हेंबर आणि डिसेंबर या काळात सोन्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. लग्न आणि सणांच्या काळात ज्वेलरी, वाहन उद्योग, सेवा या क्षेत्रातील उद्योगांनाही भरभराट येते. त्यामुळे नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये या उद्योग क्षेत्रांना उभारी मिळण्याची शक्यता आहे.

उत्सवाच्या काळात सोन्या-चांदीची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. दरम्यान, सध्या सोन्या-चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. परताव्याच्या बाबतीत विचार केल्यास सोन्यापेक्षा चांदीला चांगला परतावा मिळत आहे. अशा परिस्थितीत चांदीची किंमत एक लाख रुपये किलोच्या पुढे जाऊ शकते. भारतात सणासुदीच्या काळात सोन्या-चांदीची खरेदी वाढते. कारण धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणात दागिन्यांची खरेदी केली जाते. सणांनंतर लग्नाचा हंगाम येतो. त्यामुळे देशात सोन्या-चांदीची औद्योगिक मागणी वाढते. अशा परिस्थितीत सोन्या-चांदीमध्ये गुंतवणूक करणारे लोक अल्पावधीत भरपूर कमाई करतात. सोन्या-चांदीच्या किंमतींचा आढावा घेतल्यास गेल्या काही दिवसांमधील आकडेवारीवरून दिसून येते की चांदीमधील गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळाला आहे. अमेरिकन ‘फेडरल रिझर्व्ह’ने आपल्या व्याजदरात ०.५ टक्क्यांनी कपात केल्यापासून सोन्या-चांदीच्या दरात वाढ होताना दिसत आहे. अमेरिकेच्या ‘फेडरल रिझर्व्ह’ने दरकपात केल्यापासून चांदीच्या किमतीत पाच टक्के वाढ झाली आहे तर सोन्याचे दर केवळ ३.५ टक्के वाढले आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारही मोठ्या प्रमाणात चांदीमध्ये गुंतवणूक करत आहेत.

चांदीच्या किंमतीत वाढ होण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्याचा औद्योगिक वापर. इलेक्ट्रॉनिक्सपासून बॅटरी आणि सेमीकंडक्टरपर्यंत प्रत्येक गोष्टीत चांदीचा वापर केला जातो. दरम्यान, चीनच्या सेंट्रल बँकेनेही व्याजदरात कपात केली आहे. त्यामुळे चांदीची औद्योगिक मागणी वाढली आहे. चांदीच्या दरात वाढ होताना दिसत आहे. सध्या भारतात चांदीची किंमत ९३ हजार रुपये प्रति किलो आहे. यामध्ये तीन टक्के जीएसटी समाविष्ट आहे. चांदीची मागणी वाढल्यास दरात आणखी तेजी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सराफा बाजारातील तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार येत्या सहा ते नऊ महिन्यांमध्ये चांदीचे भाव एक लाख रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीची किंमत ३१.१८ डॉलर प्रति औंस आहे. दिवसेंदिवस सोन्या-चांदीच्या दरात मोठी वाढ होत आहे. यामुळे खरेदीदारांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे.

आजकाल

# भारतीय बँकिंग क्षेत्राची दोन्ही बाजूने कोंडी



**संजीव चांदोरकर**

बँका दोन्ही हाताने धंदा करतात.

एका हाताने देशातील बचती गोळा करतात.

दुसऱ्या हाताने त्यातून क्रेडिट तयार करून (अक्षरशः तयार करून !) कर्ज देतात.

कर्ज घेणारे प्रामुख्याने दोन प्रकारचे कर्जदार असतात.

एक : कॉर्पोरेट क्षेत्र

दोन : रिटेल क्षेत्र : ज्यामध्ये व्यक्ती, कुटुंबे, गृह, कर्ज वाहन कर्जे, शैक्षणिक कर्ज, नोंदणीकृत नसलेले छोटे उद्योग धंदा व्यवसाय मोडतात.

बँकांकडे गोळा होणाऱ्या बचती प्रामुख्याने व्यक्ती आणि कुटुंबांकडून येतात. अर्थात बचती तयार होण्यासाठी मासिक/ वार्षिक मिळकत एवढी हवी की सर्व खर्च भागवून बचती उरतील. त्यामुळे या व्यक्ती व कुटुंबे श्रीमंत, उच्च, मध्य, काही प्रमाणात निम्न मध्यम वर्गातीलच असतात.

यांची संख्या २० ते ३० टक्के असेल. उरलेले ७० ते ८० टक्के कोट्यावधी गरीब नेहमीच नेट कर्जदार असतात.

गेल्या ३० वर्षातील नव उदारमतवादी आर्थिक धोरणामुळे या वरच्या २० ते ३० टक्के नागरिकांकडे मोठ्या प्रमाणावर वित्तीय स्त्रोत गोळा झाले आहेत.

या वर्गाने बँकेतील ठेवीपेक्षा इतर प्रकारच्या बचतींना प्राधान्य दिले आहे. उदाहरणार्थ शेअर्स, म्युच्युअल फंड, एसआयपी, विमा इत्यादी. त्यांच्यातील श्रीमंत व्यक्ती तर आपल्या बचती प्रोफेशनल वेल्थ मॅनेजमेंट कंपन्यांकडे सुपूर्द करतात. किंवा गुंतवणुकीसाठी स्वतःची प्रायव्हेट ऑफिसेस चालवतात.

उदा. शेयर मार्केट मध्ये लाखो कोटी रुपये वाहत आहेत. म्युचल फंडांकडील ऍसेट अंडर मॅनेजमेंट ५५ लाख कोटि पेक्षा जास्त आहे. आणि त्यात वेगाने भर पडत आहे.

या वर्गाने आपल्या बचती दुसरीकडे वळवल्यामुळे त्या प्रमाणात बँकिंग उद्योगाकडील ठेवी आक्रसत आहेत त्या गेल्या ४० वर्षातील नीचांकावर आहेत.

दुसऱ्या बाजूला बँकाकडून मोठ्या प्रमाणावर कर्जाची उचल करणारे कॉर्पोरेट क्षेत्र आता बँकांव्यतिरिक्त इतर मार्गांनी कर्जाची उभारणी करत आहे.

त्याला प्रायव्हेट प्लेसमेंट म्हणतात. गेल्या काही वर्षातील प्रायव्हेट प्लेसमेंट द्वारे देशातील कॉर्पोरेट क्षेत्राने केलेली कर्ज उभारणी. आकडे लाख कोटिंमध्ये

२०२२ : ७ लाख कोटी

२०२३ : १० लाख कोटी

२०२४ : आठ महिने : ८ लाख कोटी

त्यामध्ये म्युच्युअल फंड, विमा कंपन्या, वेल्थ मॅनेजर, प्रायव्हेट ऑफिसेस, मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवतात.

त्याशिवाय भारतातील कॉर्पोरेट आंतरराष्ट्रीय बाजारात देखील कर्ज उभारणी करत आहेत. गुजरात मधील भारत सरकारने स्थापन केलेल्या मध्ये अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय कर्ज उभारणीची सुविधा आहे. त्यामुळे याला बरीच चालना मिळाली आहे.

(जाता जाता: अलिकडेपर्यंत बँकिंग, वित्त क्षेत्रात भारताला जगाशी जोडणारा ब्रीज मुंबईतून जायचा. नक्की काय आहे. आणि ती भविष्यात मुंबईवर नक्की कसा परिणाम करणार आहे. याबद्दल मराठी माणसात अंधार आहे. असो)

कॉर्पोरेट क्षेत्र आपल्याकडून पूर्वीसारखी कर्जाची उचल करत नाही हे लक्षात आल्यावर बँकिंग क्षेत्राने रिटेल कर्जे मोठ्याप्रमाणावर वाढवली आहेत. आपल्याला तुलनेने हलली जी सहजपणे कर्जे मिळत आहेत त्याचे महत्वाचे कारण हे आहे. आपल्याला माहीत असलेल्या भारतीय बँकिंग क्षेत्रामध्ये बरेच संरचनात्मक बदल होत आहेत हे नक्की.

हे बदल सारखे एका रात्रीत नाट्यपूर्ण रितीने येऊन आदळत नाहीत. हे सारखे असतात.

फक्त कोणाचे रक्त काढून कोणात घातले जात आहे ते कळेल. बऱ्याच वेळा एक समज आसा बाळगला जातो की हे सगळे प्रश्न त्या कॅम्प मधले, म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेतील प्रश्न आहेत. आपल्याला काय त्याचे? पण तसे ते नाहीत. अगदी उद्या शेयर मार्केट कोसळले तरी त्याची दगड माती आपल्यावर पडू शकते, वाईट म्हणजे गाडू शकते म्हणून या सगळ्याचा ट्रॅक तरी ठेवला पाहिजे.

लोकसंसद

## मराठीला भाषेचा दर्जा देण्यामुळे अनेक फायदे होणार

केंद्र सरकारने नुकताच मराठी सह देशाच्या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. अभिजित भाषा अशी वर्गवारी निर्माण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने प्रथम १२ ऑक्टोबर २००४ साली घेतला. त्यावेळी तमिळ भाषेला दर्जा देण्यात आला. त्यानंतर संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम, उडिया या भाषांना हा दर्जा मिळाला. आता मराठी, पाली प्राकृत, असामी अशा पाच भाषांना हा दर्जा मिळाला. एकूण आत्तापर्यंत दहा भाषांना हा दर्जा देण्यात आला. मराठी भाषा ही अभिजात भाषेच्या दर्जाच्या सर्व अटी पूर्ण करता असतानाही हा दर्जा मिळण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहत बसावी लागली. महाराष्ट्रात लवकरच विधान सभेच्या निवसणुका होणार आहेत. त्या आधीच हा निर्णय घेण्यात आला आहे हा निर्णय घेतला नसता तर कदाचित विरोधी पक्षाने याचे भांडवल केले असते व निडणुकीत हा मुद्दा प्रचारात उचलला असता. या अभिजात भाषेच्या दर्जामुळे शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात अनेक रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. प्राचीन ग्रंथांचे जतन दस्तऐवजीकरण भाषांतर, प्रकाशन व डिजिटल मीडिया या क्षेत्रात अनेक नोकऱ्या निर्माण होतील. अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे मराठीला आंतरराष्ट्रीय स्तरावर सांस्कृतीक आणि शैक्षणिक प्रभाव वाढण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारकडून आता कोट्यवधींचा निधी मिळू शकेल. त्याचा उपयोग आपणास विविध कामासाठी करता येईल. आता देशातील ४५० विद्यापीठामध्ये मराठी शिकविण्याची सोय केली जाईल.

**- शांताराम वाघ, पुणे**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**५ ऑक्टोबर**

**१८८०:-** कवी कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी यांचा जन्म. २०० स्पुट कविता, काही मनोरंजक, गोष्टी व निबंध इ साहित्य. ‘करकल्लोलिनी’ हा काव्यसंग्रह प्रसिध्द. त्यांच्या काही कविता पंचतंत्रातील तात्पर्य कथाही गुंफल्या आहेत. तसेच पारखीषास्त्रीच्या संस्कृत कुटांच्या धर्तीवरील ‘भावगुप्त पद्यातील प्रष्नांची समर्पक उत्तरे देणाऱ्या कविताही त्यांनी रचल्या आहेत. **१८८४:-** महाभारत व वेदकाळाकडे मानवी दृष्टीने पाहणारे संषोधक व वेदविद्याभ्यासक हरी रामचंद्र दिवेकर यांचे निधन. ‘भीष्माची भयंकर भूल’ हा त्यांचा लेख वादग्रस्त ठरला. तर ‘भारतीय प्राचीन ग्रंथाना अपेक्षित शासन व्यवस्था’ हा ग्रंथ आणि बाबराच्या स्मृतिचित्रांचा अनुवादही त्यांनी केला. **१८८८:-** ‘मुलांचा महाराष्ट्र’ या इतिहासकथनपर पुस्तकाचे लेखक गोविंद अनंत मोडक यांचा जन्म. ‘युरोपचे आधारस्तंभ’, ‘मर्दानी झाषीवाली’,‘इंग्लंडचा इतिहास’ ही पुस्तकेही त्यांनी लिहिली होती. त्यांनी लिहिलेल्या ‘मुलांचा महाराष्ट्र’ या पुस्तकाने महाराष्ट्रातील आबालवृध्दांमध्ये मराठयांच्या इतिहासाची गोडी निर्माण झाली. त्याने इतिहासावरील विविध ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची साक्ष देतात. **१९२०:-**लेखक नारायण महादेव दिक्षित यांचा जन्म. ह्यांनी ‘अनुभव प्रकाष’ ह्या हिंदी अध्यात्मिक ग्रंथाचा अनुवाद याच नावाने मराठीतून लिहिला. **१९२२:-** सानेगुरुजींच्या ‘धडणाऱ्या मुलां’पैकी एक, अषी ओळख असलेले लेखक, ‘साधना’ साप्ताहिकाचे दीर्घकाळ संपादक यदुनाथ थत्ते यांचा जन्म. ‘चले जाव’ पासून ‘एक गाव एक पाणवठा’, ‘मुस्लीम सत्यषोधक’ अषा अनेक चळवळींषी त्यांचा संबंध होता व त्याचे वैचारिक प्रतिबिंब त्यांच्या राजकीय-सामाजिक लेखात दिसे. कादंबरी, बालकादंबऱ्या, कथा आणि ‘प्रतिज्ञा’ हे भारतीय प्रतिज्ञेच्या शब्दा-शब्दाचा अर्थ उलगडणारे पुस्तक असे विपुल लेखन त्यांनी केले होते. **१९३४:-** वैदर्भीय कवी अण्णाजी बोबडे यांचे निधन. ‘बोबडे यांची कविता’ हे संकलन मरणोत्तर प्रकाषित झाले. **१९३५:-** कवी डॉ. श्रीधर कृष्ण शनवारे यांचा जन्म. ‘आतून बंद बेट’ व ‘थांग अथांग’ आदी सहा काव्यसंग्रहांसह त्यांची १५ पुस्तके आजवर प्रकाषित झाली आहेत. त्यामध्ये ‘राक्षसाचे वाडे’ हा बालकुमार काव्यसंग्रह, ‘अभिनव मराठी व्याकरण-मराठी लेखन’ हा व्याकरण विषयक ग्रंथ, कथाकार वामन चोरघडे हा समीक्षात्मक तर ‘कोलंबसाची इंडिया’ हा प्रवासवर्णन तसेच ‘थेंब थेंब (चिंतन) आणि काही अनुवादीत ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९३७:-**लेखक, पत्रकार, समाजसेवक दषरथ सीताराम वळ यांचा जन्म. ‘षोध आणि बोध’ हे त्यांचे पुस्तक. ‘घरदुरुस्ती’,‘झोपट्टी’ या विषयावर बेतलेले आहे. **१९४१:-** लेखक मोहन महादेव आंगणे यांचा जन्म. त्यांचा साहित्यसंपदेत ‘रानवाट’,‘गावाकडच्या कविता’,‘दै. गर्जना चंद्रपूर’ हे प्रांतिनिधिक काव्यसंग्रह तर ‘प्रमोव्हिसंपदा’ हा कथासंग्रह याषिवाय विविध वृत्तपत्रांतून विविध विषयांवर सातत्याने लेखन. **१९५६:-**इतिहास संषोधम, लेखक मोरेष्वर रामचंद्र जोषी यांचे निधन. ‘पोस्टाच्या तिकिटाची कुळकथा’, ‘अहिल्याबाई होळकर’, ‘स्वामीनिष्ठ खंडो बल्लाळ’,‘ऐतिहासिक आख्यायिका’ या पुस्तकांषिवाय तात्या जोगांच्या चरित्रांची साधने आणि राजवाडे यांच्या मराठयांच्या इतिहासाची साधने : खंड २७ हा त्यांचा महत्त्वपूर्ण संपादित ग्रंथ. **१९६२:-** षिक्षण, विज्ञान, तत्त्वज्ञानविषयक लेखन करणारे वैज्ञानिक शंकर लक्ष्मण गोखले यांचा निधन. मेकॅनिकल इंजिनीअर असलेल्या गोखल्यांनी ‘मार्गदर्षक षिक्षण पध्दती’ या ग्रंथासह ‘ख्रिस्ती धर्म आणि जातीभेद, जातीभेदाची उत्पत्ती, हिंदुधर्म व कुराण, हिंदु शब्दाच्या व्याख्येची मीमांसा’ या विषयांवर लेख लिहिले. **१९६८:-** लेखक सुरेष दत्ताराम खोब्रागडे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत ‘दीक्षा भूमी : एक चिंतन’ हे दीर्घकाव्य. ‘मोर्चा’ हा काव्यसंग्रह. ‘मी आंबेडकरी बोलतोय’ ह्या एकपात्री प्रयोगासह ‘अक्षरवाहिनी’ हा संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहे.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्ट उपक्रम

**। पनवेल । वार्ताहर।**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल हा पनवेलमधील सामाजिक कार्यासाठी नावाजलेला क्लब म्हणून ओळखला जातो. गेली ३५ वर्षं आमचा क्लब डॉ गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवत आहे. या उपक्रमासाठी लागणारा निधी आमच्या क्लबच्या सभासदांव्यतिरिक्त काही फंड रेझिंग प्रोजेक्टच्या माध्यमातून समाजातूनही जमा केला जातो ज्याचा विनियोग स्वच्छ सुंदर सुरक्षित पनवेल या उपक्रमाअंतर्गत येणाऱ्या प्रोजेक्ट साठी केला जातो. गेली १३ वर्षं दिवाळी ड्रायफ्रुट हा फंड रेझिंग प्रोजेक्ट आम्ही राबवतोय ज्यात आम्ही रोटेरियन आणि आमच्या नस् स्वतः मेहेनत करून हे ड्रायफ्रुट बॉक्सेस निवडून खरेदी करतात. त्यात ड्रायफ्रुट भरून असे आकर्षक बॉक्सेस तयार करतात. हे बॉक्सेस अतिशय कमी प्रॉफिट मार्जिन ठेवून आम्ही विक्रीसाठी ठेवतो.

आज २०२४/२५ या वर्षातील दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्टच्या शुभारंभासाठी पनवेलचे प्रसिद्ध बिल्डर राजू गुप्ते आणि प्रसिद्ध शल्यचिकित्सक रोटेरियन डॉ गिरीश गुणे हे गेस्ट ऑफ ऑनर म्हणून उपस्थित होते. शैलेश पोटे, दीपक गडग आणि विवेक वेलणकर आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत आजचा कार्यक्रम अतिशय दिमाखात संपन्न झाला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे जांबरुंग ठाकूरवाडी, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमीन मिळकत आमचे अशिल यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिपक जगन्नाथ कांडपिळे व सौ. दिप्ती दिपक कांडपिळे यांच्या कडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३ | ०-२४-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण :०-२७-०० | ०.१६ |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

खालापूर
ता. ०५-१०-२०२४

सही/-
**ॲड. पुजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा,
निर्माण नगरी, नेरळ (पू) ता.कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १०/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री.विनायक नथुराम कोळी
रा. रेवस, पो. हाशिवरे — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत रेवस, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे रेवस, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्री. विनायक नथुराम कोळी यांचा जन्म दि. ०९/०७/१९९४ रोजी मौजे रेवस, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत रेवस येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवस यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २४/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड)**

ज.म.र अर्ज ३९/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. प्रकाश मुलचंद जैन
मु. पो. पोयनाड, बाजारपेठ पोयनाड — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे पोयनाड, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची भाची कु. रिता प्रकाश जैन (रिता कल्यान जैन) यांना जन्म दि ०६/१२/१९७५ रोजी मौजे पोयनाड, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पोयनाड येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत पोयनाड यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.
आज दि.२५/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २५/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ५५/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. महेंद्र दामोदर पिंगळे
मु. कमळपाडा, पो. शहाबाज, — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१.अर्जदार हे मौजे कमळपाडा, पो. शहाबाज, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडिल कै. दामोदर तुकाराम पिंगळे यांचा मृत्यु दि. २८/०२/२००१ रोजी मौजे कमळपाडा, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत शहावाज येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत शहाबाज यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत /तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर मआपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २४/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १५/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. शशिकला अनंत पाटील
रा. बेलपाडा, पो. हाशिवरे — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रेवस, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे बेलपाडा, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्रीम. शशिकला अनंत पाटील यांचा जन्म दि. ०५/०७/१९६७ रोजी मौजे बेलपाडा, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत रेवस येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवस यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २४/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील (१) श्री. मिलिंद काशिनाथ शेवडे, (२) सौ. बिना किशोर पडवळ, (३) श्री. सचिन काशिनाथ शेवडे, (४) श्री. मनिष काशिनाथ शेवडे, (५) सौ. अनिता सतिश गोलतकर, (६) श्री. अनुप सुनिल गुळेकर, (७) श्री. अमित सुनिल गुळेकर, (८) सौ. प्रणिता प्रशांत चमणकर यांच्या व इतर काही व्यक्ती यांच्या सहमालकीच्या व ताबेकब्जाच्या मौजे वाडगांव व मौजे वेश्वी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र (ह.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वाडगांव, ता. अलिबाग | १/१ | ०-३२-३०<br>पो.ख. ०-०३-१०<br>एकूण ०-३५-४० | ७-६० |
| वेश्वी, ता. अलिबाग | ७८ | ०-५७-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण ०-६०-०० | ५-३७ |

सदर मिळकतींमध्ये आमच्या अशीलांचे वारसाहक्काने मालक व कब्जेदार म्हणून कायदेशीर हक्क, हितसंबंध व अधिकार आहेत. अद्याप सदर मिळकतींचे वाटप झालेले नाही व प्रत्येकाच्या हिश्याच्या हद्दी निश्चित झालेल्या नाहीत. तरी सदर मिळकतींमध्ये कोणीही, कसलाही, कोणताही व्यवहार आमच्या अशिलांच्या हक्कास बाधा येईल अशा स्वरूपाचा करू नये. असा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक होणार नाही याची नोंद सर्वांनी घ्यावी. याउपरही कोणीही वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत व्यवहार केल्यास आमचे अशील त्यांच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करतील व त्या व्यक्ती प्रामाणिक खरेदीदार होणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : -१०-२०२४.

**(ॲड. गणेश शांताराम भगत)**
मु. वाडगांव, पो. वेश्वी,
ता. अलिबाग, जिल्हा-रायगड
मो - ९८८१५२८७७०

## महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दुरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ६७ ( ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and 'www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप- या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०१.१०.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक ०८.१०.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली दुकान गाळा मिळकत व त्या गाळ्याचे मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे व सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरोसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या दुकान गाळा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ११३ अ हिस्सा नं. १ ब, या मिळकतीवरील भास्कर रेसिडेन्सी को. ऑप. हौ. सोसायटी लि. मधील दुकान गाळा नं. ०४, क्षेत्र २७५ चौ.फुट बिल्टअप् (२५.५५ चौ. मी.) ज्याचा ग्रामपंचायत चेहरे मालमत्ता / मिळकत क. ११२१/४ ही दुकान गाळा मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर दुकान गाळ्यावर कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची दुकान गाळा मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग,
तारीख : ०४/१०/२०२४

**ॲड. सागर विजय पाटील**
पत्ता मु. घर नं. १६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९९२२५६७८९१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) मारीबाना उर्फ मरीयाना फिलीप डिसोझा, २) प्रिसरला डिसोझा दोघेही रा. मु. पो. सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सहाण ता. अलिबाग | ३४८/५ | २-८७-०० | २८-७० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. ०४-१०-२०२४.

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
**चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी**
**ब्राम्हणआळी अलिबाग**

अर्जदारतर्फे ॲड. अभिजीत बाळाराम पाटील

## जाहिर नोटीस
**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १७९/२०२४

१) श्रीमती शोभना जगन्नाथ डोळस
वय ८० वर्षे, धंदा गृहिणी,
रा. मुनवली, हनुमान मंदिरा जवळ,
पो. मापगाव, ता.अलिबाग, जि. रायगड
२) श्री. सुनील जगन्नाथ डोळस
वय ५८ वर्षे, धंदा शेती,
गुळ रा. मुनवली, हनुमान मंदिरा जवळ, — अर्जदार
पो. मापगाव, ता.अलिबाग, जि. रायगड
सध्या रा.१०४, लखनी सनकोस्ट,
फ्लॅट नं. २७, विभाग १५ केच्या जवळ,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ठाणे
३) श्री. सुरेंद्र जगन्नाथ डोळस
वय ५४ वर्षे, धंदा: शेती,
रा. मुनवली, हनुमान मंदिरा जवळ,
पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
४) सौ. सुचिता अजय संसारे
(पुर्वाश्रमीची सुचिता जगन्नाथ डोळस)
रा. बी-३, ४०२, रौनक पार्क, कोकणीपाडा,
पोखरन रोड नं. २, व्हीटीसी, ठाणे (प.) जि.ठाणे
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की.

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असून अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडिल कै. जगन्नाथ तुकाराम डोळस यांचे निधन दि. ०९/०५/२०२१ रोजी झाला असून अर्जदार हे मयत कै. जगन्नाथ तुकाराम डोळस यांचे वारस असलेबाबत जाहीर करून मिळणेकरिता मे. कोर्टात तसा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २५/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज दिनांक २७/०९/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही /- — सही /
**कनिष्ठ लिपिक** — (कोर्टाचा शिक्का) — **कनिष्ठ लिपिक**
**सि.ज.सि.टी. अलिबाग-रायगड** — **सि.ज.सि.टी. अलिबाग-रायगड**

## महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ६८ (ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and 'www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप - या निविदेमध्ये एकूण २ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०३/१०/२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक १०/१०/२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा. क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**पनवेल**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ५२/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. नरेंद्र लक्ष्मण गंद्रे — अर्जदार
मु. बाजारपेठ, रेवदंडा,
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येतें की,
१.अर्जदार हे मौजे रेवदंडा, ता.अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आई कै. सुशिला लक्ष्मण गंद्रे यांचा मृत्यु दि.२३/०३/१९५७ रोजी मौजे रेवदंडा, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत रेवदंडा येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवदंडा यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/
तारिख : २४/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. सिताराम शंकर रहाटे
मु. बेलकडे, पो. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड — अर्जदार
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत बेलकडे.
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे बेलकडे, पो. कुरुळ, ता.अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची बहिण कै. कुसुम उत्तम शेरेकर यांचा मृत्यु दि.२७/०१/१९९० रोजी मौजे बोडणी, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत बेलकडे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत बेलकडे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.
आज दि. २५/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २५/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज २०/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. रेणुका चंद्रकांत पाटील
रा. द्वारा. श्री. चंद्रकांत पाटील, — अर्जदार
न्यु म्यकुन्सिपल कॉलनी, ३६ टेनामेंट ब्लॉक,
रूम नं. १३, सशमिरा मार्ग, वरळी, मुंबई
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत रेवस, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे बेलपाडा, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्रीम. रेणुका चंद्रकांत पाटील यांचा जन्म दि. ०१/०१/१९६४ रोजी मौजे बेलपाडा, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत रेवस येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवस यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख :२४/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रथमेश प्रविण राऊत रा.चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे स्नेही सौ. अलका प्रभाकर मोहिते, रा. चौल, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल | ३२ | | ०-१४-५० | ९.०२ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-०१-७० | |
| | | एकूण | ०-१६-२० | |

या बागायत मिळकतीपैकी श्री. प्रथमेश प्रविण राऊत यांचे मालकीहक्कात असलेले ०-०५-१० हे. आर. क्षेत्र, आकार रु.२.८५ पैसे या बागायत मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०९/२०२४ — सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी), पो.चौल
ता. अलिबाग, जि. रायगड.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १७/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. पुष्पलता हरिश्चंद्र पाटील
(पुर्वाश्रमीची कमळ पांडुरंग पाटील) — अर्जदार
रा. मु. सरदार आळी, आगरकोट
पो. रेवदंडा, ता.अलिबाग जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत नागाव, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार हे मौजे बागमळा, ता.अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्रीम. पुष्पलता हरिश्चंद्र म्हात्रे (पुर्वाश्रमीची कमळ पांडुरंग पाटील) यांचा जन्म दि ०१/०६/१९६५ रोजी मौजे बागमळा, येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नागांव येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत नागांव यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.
आज दि. २५/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २५/९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

निवडक

## डाक कर्मचाऱ्यांचे रक्तदान

**रायगड :** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान सैनिकाप्रमाणे प्रत्यक्ष देशसेवा करता येत नसली तरी रक्तदानातून उत्तम सेवा करू शकतो अशी माहिती रायगड डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी कर्मचारीवर्गास सांगत ऐच्छिक रक्तदान दिनानिमित रक्तदान करण्याचे आवाहन केल्याने या प्रेरणेमुळे डाक कर्मचारीवर्गाने स्वइच्छेने रक्तपेढी जाऊन या दिवसानिमित रक्तदान केले. या अभियानात सहभागी होत निशा राणी, एकता श्रीवास्तव, मनोज अंबुरे, नागेश शैला साखरकर, मिलिंद पाटील यांनी रकतदान केले.

## दिपक पाटील यांना पुरस्कार



**अलिबाग :** तालुक्यातील वाघ्रण येथील पत्रकार दिपक यशवंत पाटील यांना माणगांव तालुका पत्रकार संघाचा सन २०२४ चा पत्रकार भूषण पुरस्कार जाहीर झाला असून शनिवारी (दि. ५) दुपारी ३ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार असल्याचे अधिकृत निमंत्रण संघाचे अध्यक्ष सलिम शेख यांनी पत्रिकेद्वारे कळवले आहे.

## वह्या वाटप कार्यक्रम संपन्न

**बोर्लीपंचतन :** रा. पां. दिवेकर दांडगुरी हायस्कूल दांडगुरी हायस्कूलमध्ये रोटरी क्लब मुंबई यांच्यामार्फत व माजी विद्यार्थी नरेश काते व विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व पंचकोशी क्रीडा मंडळाचे सचिव सुधीर वाणी यांच्या अथक प्रयत्नातून विद्यालयास एकूण १००० वह्या उपलब्ध झाल्या. या वह्या वाटपाचा कार्यक्रम विद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा सहा वह्यांचे वाटप करण्यात आले.

## ट्रान्सफर फी मधून सुटका

**पनवेल :** सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी निर्मल भवन येथे सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समवेत एक बैठकीदरम्यान ऐतिहासिक निर्णय पारित केला. या निर्णयाच्या अंतर्गत, महाराष्ट्रातील सर्व सिडकोची घरे फ्री होल्ड करण्याचा प्रस्ताव एकमताने बैठकीत मंजूर केला गेला. म्हणजेच आता सिडको परिसरात राहणाऱ्या फ्लॅट धारकांना, ट्रान्सफर फी भरण्याची गरज नाही, तसेच कन्वेंस डीड करताना लागणारा सिडको ट्रान्सफर फी पूर्णपणे माफ करण्यात आली आहे.

## स्वच्छता अभियान संपन्न

**सोगाव :** एसओएस कुटुंब सशक्तीकरण कार्यक्रम सोगाव अंतर्गत ६ गावांमध्ये महात्मा गांधी जयंती निमित्त स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता हे स्वच्छता अभियान मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. यावेळी एफएसपी अलिबागने स्थापन केलेल्या ६ बाल पंचायतींनी स्वच्छता अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये तुडाळ, बांधण, वाघोडे, पोयनाड, भाकरवड आणि पेण तालुक्यातील आमटेम अशा एकूण ६ बाल पंचायतीतील मुले, मुली सहभागी झाले होते.

# महाडचे क्रीडा संकुल धूळ खात

## सोयी-सुविधांचा अभाव, देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष, खेळाडूंची गैरसोय

**। महाड । वार्ताहर ।**

**चांगल्या दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत, आंतरराष्ट्रीय पातळीवरती भारताची प्रतिमा खेळात उंच व्हावी तसेच एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या खेळांचा सराव खेळाडूंना करता यावा यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार महाड तालुक्यातील लाडवली येथे उभारण्यात आले, मात्र सोयी-सुविधांचा अभावामुळे क्रीडा संकुलाची इमारत धूळ खात पडली आहे. संकुलात खेळाडू तयार होण्याऐवजी याचा वापर आता तळीराम व भिकारी करू लागले आहेत.**

तालुक्यातील होतकरू खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत या उद्देशाने तालुक्यातील लाडवली ग्रामपंचायत हद्दीत एक एकर जागा संपादित करून तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. सरकारने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय घेतला घेतल्यानंतर २०१६ मध्ये लाडवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत महाड तालुका क्रिडा संकुलाच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. संकुलासाठी एक कोटीचा निधी मंजूर करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ८३ लाख रुपये वर्ग करण्यात आले. या क्रिडा संकुलासाठी आवश्यक असणाऱ्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. संकुल पूर्ण होण्यासाठी तब्बल सात वर्षांचा कालावधी लागला.



### नेहुलीतील क्रीडा संकुलाचीही दुरवस्था

**नेहुली येथे उभारण्यात आलेल्या संकुलाचीही दुरवस्था झाली असून एकेक विभाग हळूहळू बंद होत आहे. संकुलाच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वर्षाला किमान १५ लाख रुपयांची गरज असताना क्रीडा कार्यालयाकडे फक्त दोन लाख रुपये शिल्लक आहेत. निधीच नसल्याने इनडोअर स्टेडिअमचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला आहे.**

खेळाडूंसाठी हे क्रीडा संकुल खुले होण्यापूर्वी इमारतीच्या बांधकामाची मोडतोड झाली असून फरशा तुटल्या आहेत. संकुलातील फरशा, विद्युत साहित्य, स्वच्छतागृहातील साहित्याची चोरी झाली आहे. त्यामुळे इमारत पूर्ण होऊनही धूळ खात पडली आहे. याठिकाणी बॅडमिंटन कोर्ट उभारण्यात आले आहे. मात्र हे संकुल आणि त्याची रचना चुकीची असल्याचे क्रीडा तज्ज्ञांनी सांगितल्यानंतर त्याची देखील दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. क्रीडा संकुलाची इमारत शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणे अपेक्षित होते. मात्र शहराजवळ जागा उपलब्ध नसल्याने जवळपास तीन ते चार किलोमीटर अंतरावर बांधण्यात आले आहे.

> **उत्तम खेळाडू निर्माण करायचे असतील तर त्यांना दर्जेदार सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे. महाड येथे क्रीडा संकुल असूनही त्याचा उपयोग खेळाडूंना होत नसेल तर हा खेळाडूंवर अन्याय आहे. हे संकुल सर्व खेळाडूंसाठी लवकर उपलब्ध व्हावे.**
> **- सई शिंदे, खेळाडू.**

त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडू ऑलिंपिकसाठी तयार व्हावेत हा उद्देश यातून सफल होताना दिसत नाही तसेच यामुळे या ठिकाणी लहान खेळाडू तसेच इतर खेळाडू यांना ये जा करणे शक्य नसल्याने संकुलाचा वापरदेखील मर्यादित राहणार आहे. याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनुर त्यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## ४ कोटींचा भात प्रकल्प उभारणार- विपुल उभारे

**। माणगाव । वार्ताहर ।**

महाराष्ट्र शासन मस्मार्टफ प्रकल्पांतर्गत तब्बल ४ कोटी किंमतीचा भात प्रक्रिया प्रकल्प माणगाव जवळील दाखणे येथे उभारण्यात येणार असून त्याचा फायदा येथील शेकडो शेतकऱ्यांना होणार आहे, अशी घोषणा माणगांव तालुका फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या वार्षिक सभेत अध्यक्ष विपुल उभारे यांनी केली.

माणगांव तालुका फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा दाखणे येथे आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त, माजी सरपंच दिलीप पांडुरंग उभारे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

प्रास्ताविकपर भाषण करताना विपुल उभारे यांनी कंपनीच्या कामकाजाची सविस्तर माहिती उपस्थित मान्यवर, सभासद, महिला, शेतकरी बांधवाना दिली. महाराष्ट्र शासनाच्या बाळासाहेब ठाकरे ग्रामिण कृषी परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाअंतर्गत माणगांव तालुका फार्मर प्रोड्युसर या आपल्या कंपनीला भात या पिकावरती प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प उद्योग उभारण्याकरिता प्राथमिक मान्यता मिळाली असून लवकरच सविस्तर प्रकल्प अहवालालासुद्धा अंतिम मंजुरी मिळेल असा विश्वास व्यक्त केला. या प्रस्तावित प्रकल्पाची अंदाजित किंमत ४.० कोटी रुपये असून या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात, नफ्यात वाढ होणार असून आपल्या भागात रोजगार निर्मिती होऊन अर्थकारणाला सुद्धा चालना मिळणार आहे.

खऱ्या अर्थाने शेती आणि माती आपल्याला जगवते, म्हणूनच शेतीपासून कधीही दूर न जाता घाम गाळून आपल्या या काळ्या आईची सेवा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष दिलीप पांडुरंग उभारे यांनी अध्यक्षीय भाषणात आपल्याकडे १९७६ सालामध्ये कृषी मेळाव्यातील बाजारामधून केवळ १० रुपयांमध्ये विकत घेतलेल्या म्हशीच्या बीज-वंश परंपरेतून जन्मास येत असलेल्या म्हशी आजही आपल्या गोठ्यात असल्याचे उदाहरण देत पशुधन आणि दुग्धव्यवसायाचे महत्व सांगितले.

## राघो पाटील यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**

नाट्य कलावंत ते आदर्श शिक्षक राघो लक्ष्मण पाटील यांचे रविवारी (दि२९) रोजी निधन झाले.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुळेखंड येथे ते मुख्याध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन तसेच शाळेचे कामकाज पाहत होते. पुनाडे गावातील स्मशानभूमीत त्यांच्या देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.याप्रसंगी अनेकांनी राघो गुरुजींना श्रध्दांजली अर्पण केली.

## प्रा. संभाजीराव सूर्यवंशी यांच्या इंग्रजी काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**महाड :** आयडीयल इंग्लिश स्कूल शेख हुसैन काझी इंग्लिश हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा. संभाजीराव सूर्यवंशी यांच्या माय पोएटिक फ्लाईट या इंग्रजी काव्यसंग्रहाचे दिल्ली येथील ड्रीमबुक पब्लिशिंग या संस्थेने प्रकाशन केले.

या काव्यसंग्रहातील कवितांच्या माध्यमातून प्रा. सूर्यवंशी यांनी आपल्या मनातील आंतरिक भावना, संवेदनशीलता, प्रेम, सहिष्णुता, मानवता, दुःख, संघर्ष, मैत्री, कौटुंबिक आणि सामाजिक नातेसंबंध, ग्रामीण जीवन, निसर्ग त्याचप्रमाणे प्रेरणा आणि सकारात्मकता यांची कवितांच्या माध्यमातून अनुभूती दिली आहे.



● जय भवानी मित्र मंडळ धोलपाडा



● मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या महिला कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी देवीची आराधना करण्याकरिता हिरवी साडी परिधान करुन नवरात्रौत्सव आनंदात साजरा केला. यावेळी दीप्ती एरंडे, पल्लवी डोंगरीकर, स्मिता मुरुडकर, स्वप्ना विरकुड, नम्रता करडे, रिया बांद्रे आदींसह अन्य महिला उपस्थित होत्या.
(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

● अलिबाग-मुंबई हायवेवर पिंपळभाट येथे ३००० स्क्वे. फूट, हॉल/जागा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. गरजूंनी अथवा इच्छुक एजंटने संपर्क करावा. संपर्क- ९२२६३७९८४४/९८२३९२७२८८

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सअॅपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.

● 'इंद्रप्रस्थ' करीता रात्रपाळीच्या कामाकरीता माणूस पाहिजे. संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४

● अलिबाग आणि परिसरातील BSC पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी त्वरित संपर्क करा. ९६८९८९२१२१

● अलिबाग-मांडवा-रेवस मार्गावरील लोणारे (मानी फाटा) येथील एस.के. हॉलिडे होम कॉटेज भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९०४९१४७५६८

● पोयनाड येथील ब्लॉक विकणेबाबत : पोयनाड येथील नवीन बिल्डींग हरि ॐ सोसायटी 1st फ्लोअर ब्लॉक, रोडटच ६३० एरिया रेडी पोझीशन विकणे आहे. संपर्क : ९४२२५३४३२०

● अलिबाग परिसरामध्ये पर्यटकांच्या वर्दळीच्या ठिकाणी फर्निचरसहीत हॉटेल/कॉटेज भाडेतत्वावर चालविण्यास घेणे आहे. एजंटस्चे स्वागत मो. ९९२३०३६१५६

● अलिबाग स्टॅंडपासून दोन किलोमीटर परिसरात डबल टॉयलेट, कार पार्किंग असलेला २ BHK फ्लॅट रेडिपोझिशन, प्रशस्त सोसायटीमध्ये विकत घेणे आहे. फ्लॅट १० वर्षापेक्षा जास्त जुना नसावा. एजंट चालतील. मो. ९९७०४७३९२२

● फक्त दोन वर्षे जुनी, एकहाती वापरलेली सुस्थितीतील VOLKSWAGEN TIGUAN गाडी (२००० CC/ रनिंग २२,००० किमी) योग्य किंमत आल्यास विकणे आहे. संपर्क- सुबोध- ७२७६५९१३०२

● मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत. Akshay Agencies Pimpalbhat Near Suruchi Hotel (अलिबाग परिसर आणि १० km mtr परिसराकरीता) मो. ९५०३३५५८८६

● १५०० स्क्वे. फूटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४ संपर्काची वेळ- दुपारी ४ ते रात्री ९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## खारघरमधील तरुणांचा शेकापमध्ये जाहीर पक्ष प्रवेश

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रामध्ये सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असताना आणि महाविकास आघाडीला लोकांची पसंती वाढत चालल्यामुळे. खारघर मधील अल्पसंख्याक समुदायाचे आसिफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली साकिब खान, रशीफ खान, बिलाल मंसूरी, जावेद खान, आसिफ मुकादम, अब्दुल कलाम, अब्दुल सलाम आदींच्या बरोबरीने शेकडो मुस्लिम युवकांनी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून पनवेल येथे झालेल्या एका कार्यक्रमात माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीमध्ये जाहीर प्रवेश केला.



हा पक्ष प्रवेश करण्यासाठी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य देवेंद्र मढवी, खारघरचे समाजसेवक बिलाल पटेल यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आसिफ खान यांनी सांगितले आमचे गेल्या दहा वर्षात खूप नुकसान झाले. याच कारणामुळे आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून शेतकरी कामगार पक्षात पक्षप्रवेश करत आहोत. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले आज आपण जो पक्ष प्रवेश केला आहे तो किती योग्य आहे हे थोड्याच दिवसात कळेल. आणि शेतकरी कामगार पक्षांमध्ये आपल्याला सन्मान जनक वागणूक मिळेल याची गाव्ही देतो. या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी गणेश कडू, देवा पाटील, देवेंद्र मढवी, बिलाल पटेल, रा. गो. पाटील अजित अडसूळे, प्रतीक ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## किनारपट्टीतील सुविधांना चालना

**रायगड :** इंटिग्रेटेड मेटल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, श्याम मेटॅलिक्स अँड एनर्जी लिमिटेडने किनारपट्टीच्या भागावर लक्ष केंद्रित करून स्टेनलेस स्टील रीबार उत्पादन सुरू करण्याची घोषणा केली आहे. स्टेनलेस स्टील रिबार हे खारे पाणी, ओलावा आणि इतर पर्यावरणीय परिस्थितीच्या संपर्कात असलेल्या भागात त्यांच्या गंज प्रतिरोधकतेसाठी आणि टिकाऊपणासाठी ओळखले जाते. किनारपट्टीच्या भागात गंज-प्रतिरोधक सामग्रीचे महत्त्व अनन्य साधारण आहे. रस्ते आणि पूल यांसारख्या अत्यावश्यक बांधकाम प्रकल्पांचे आयुष्य वाढवण्यासाठी किनाऱ्यापासून ३० किलोमीटरच्या आत स्टेनलेस स्टीलच्या रिबारचा वापर अनिवार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पर्यावरणीय जागरूकतेसाठी स्वच्छता अभियान

**। म्हसळा । वार्ताहर ।**

कोकण उन्नती मित्र मंडळाचे अध्यक्ष व मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, सचिव अशोक तळवटकर, खजिनदार वंदना विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवेआगर समुद्रकिनारी स्वच्छ सागर, सुरक्षित सागर या मोहिमेअंतर्गत वसंतराव नाईक कला वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय आणि दिवेआगर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

दिवेआगर ग्रामपंचायतीचे सरपंच सिद्धेश कोजबे यांनी विद्यार्थ्यांना समुद्रकिनाऱ्याचे महत्त्व समजावले. सरपंचांनी उपस्थितांना आवाहन केले की, स्वच्छता राखणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. समुद्रकिनारा केवळ आंतरराष्ट्रीय पर्यटनाचे आकर्षण नाही, तर तो स्थानिक समुदायासाठी जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यांनी समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियानाची आवश्यकता आणि त्याच्या पर्यावरणीय परिणामांवर प्रकाश टाकला.



## तहसिलदारांनी दिलेल्या लेखी आदेशाला केराची टोपली

# शेतकऱ्यांना जागेत जाण्यासाठी बिल्डरचा विरोध

**। तळा । प्रतिनिधी ।**

**मुंबई, पुणे येथील काही उद्योगपती, बिल्डर हे स्थानिक शेतकऱ्यांनाच त्याच्या जागेत शेती करण्यासाठी अटकाव करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. तळा तहसिदार यांनी शेतकऱ्यांना रस्ता वापरण्याबाबतचा लेखी आदेश दिलेला असतानाही त्याला केराची टोपली दाखवण्यात येत आहे. याबाबत प्रांताधिकाऱ्यांनी न्याय द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.**

तळा तालुक्यात बोरघर हवेली येथे मुळ शेतकरी गणेश महादेव चव्हाण तसेच वावे हवेली येथील मुळ शेतकरी राम सावंत, परशुराम सावंत, रोहिदास सावंत, एकनाथ पारावे यांची बोरघर हवेली येथे वडिलोपार्जित शेतजमिन आहे. बोरघर हवेली येथे काही बिल्डर व उद्योगपतींनी शेतकऱ्यांच्या जागा घेऊन या जागेत नर्सरी फार्म शेती केली आहे.

गोरगरीब शेतकऱ्यांच्या जागेवर या उद्योगपतीने अतिक्रमण करून या शेतकऱ्यांचे पूर्वीपासून शेतात जाण्यासाठी असलेल्या पायवाटा, रस्ते हे



तारेचे कंपाऊंड मोठ-मोठे गेट लावून बंद केले आहे. या शेतकऱ्यांचे त्याच्या जागेत जाणे पूर्णपणे बंद झाले असून शेती करता येत नसल्यामुळे त्याचे जगणेदेखील आता मुश्कील झाले आहे. स्वतः ची मालकी हक्काची जागा असूनदेखील त्या जागेत जाणारे रस्तेच उद्योगपती बिल्डरने अडवून बंद केली असल्याने या जागेत साधी बैलगाडी किवा चारचाकी वाहन नेता येत नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे पीक घेता येत नसल्याने शेतकरी आता हवालदिल झाला आहे.

गणेश चव्हाण हा सुशिक्षित बेकार शेतकरी आपल्या जागेमध्ये कसा तरी जाऊन त्याने आपल्या जागेत काही काजू, आंबे तसेच सोयाबीनची शेती केली असून राम सावंत व इतर शेतकऱ्यांना त्यांच्या जागेत जाण्यासाठी या नर्सरीच्या मालकांनी रस्ताच न ठेवल्याने या शेतकऱ्याची सुपीक जमिन वाया जात आहे. त्यामुळे त्याचे मोठे नुकसान होत आहे. तळा तहसिलदार कन्नशेट्टी यांनी २०२२ मध्ये लेखी आदेश दिलेले आहेत.

मात्र, येथील उद्योजक, बिल्डर हे शेतकऱ्यांना अटकाव करत आहेत. शेतकऱ्यांना आता आत्महत्ये शिवाय पर्याय उरला नाही. माणगाव प्रांताधिकारी यांनी आम्हा स्थानिक शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, संबंधीत उद्योजक, बिल्डर यांचे काय म्हणणे आहे हे समजू शकले नाही.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ५ ऑक्टोबर

१) श्री.अनंत श्रीधर पंडित, अलिबाग, ५-१०-१९३७
२) श्री.विनोद लक्ष्मण नाईक ब्राम्हणआळी अलिबाग, ५-१०-१९४७
३) श्री. दत्तात्रेय काशिनाथ पाटील चेंढरे-अलिबाग, ५-१०-१९४५
४) श्री. यशवंत नारायण थळे ढोलपाडा,अलिबाग, ५-१०-१९४५
५) श्री.भगवतीईश्वरन रामस्वामी अय्यर, अलिबाग, ५-१०-१९५५
६) श्रीम.मेद्याा मनोहर जगे श्रीबाग, अलिबाग ५-१०-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे.




या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



**स्व. नारायण नागू ठाकूर, स्मरणार्थ अलिबाग**



**श्री. निलेश दत्ताराम वाळंज, ६० वा. वाढदिवस, अलिबाग**

## काळ नदी पात्रात मृतदेह सापडला

**माणगाव :** काळ नदी पात्रात अज्ञात इसमाचा मृतदेह सापडल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. सदरची घटना सोमवार दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या पूर्वी घडली. याबाबतची खबर दिपाली नयन खेडेकर पोलीस पाटील निजामपूर यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. माणगाव पोलीस सूत्रांकडून माहिती अशी कि,घटनेतील अज्ञात इसम याचे प्रेत हे काळ नदीच्या पात्रात वाहत आल्याने तो पाण्यात बुडून मयत झाला. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भोसले करीत आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E- TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | E-Tender-21/24-25/Rfx No.7000033879 | E-tender for work of Removing & cutting grass, shrubs, trunks in ROW of 400 kV lines under 400 kV line maint s/dn under 400 KV RS (O & M) Division Nagothane. | Rs. 5,98,379/- | 10.10.2024 up to 23.59 hrs |

**EMD Rs.** 1% of Estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (DYEE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या–कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

[redacted]

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड**

**तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री स्टॉल उभारणेकामी जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत सन २०२४ दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके विक्रीसाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी स्टॉल उभारणीसाठी दिनांक २५/१०/२०२४ ते दिनांक ०३/११/२०२४ पर्यंतच्या कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देणेत येणार आहेत. सदर जागा मर्यादित ठेवणेत आलेल्या आहेत. इच्छुक फटाके विक्री धारकांनी आपल्या लायसन्सची प्रत अर्जासोबत जोडणेची आहे. प्रत्येक स्टॉल हा १०X१० आकाराची राहील. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

| अ.क्र. | नोड | आरक्षण | सेक्टर | भुखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) | पनवेल | प्ले ग्राऊंड | २E | ३६ | ८७६४.५४ |
| २) | कळंबोली | प्ले ग्राऊंड | १ | २८ | ३३३९२.११ |
| ३) | खारघर | प्ले ग्राऊंड | १२ | १२ | ६३४३.९५ |
| ४) | कामोठे | प्ले ग्राऊंड | ८ | २५ | ४९७६.८६ |
| ५) | तळोजा | प्ले ग्राऊंड | १० | ११३+११४ | ६६७१.५९ |

सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीसाठी महानगरपालिकेकडे जागा मिळणेकामी सबंधित इच्छुकांनी फटाके विक्री धारकांनी दिनांक ११/१०/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालयात अर्ज जमा करावेत. सदर मुदतीत प्राप्त न होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, ही संबंधितांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/माव्य/२४२४/प्र.क्र.१७/४८८/२०२४
दिनांक :- ०४/१०/२०२४

सही/-
**उप आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, **रवींद्र बंडू भुसारी,** यांनी जमीन मालक **सुगंधा सदाशिव जाधव उर्फ सानिका सुनील पांगत**, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २५/१२ | ०.११.०० | ०.१० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस : श्री साई सावली, सो.लि.
दुसरा मजला, ब्लॉक नं. १०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत,
कर्जत दि. ०५/१०/२०२४ जि. रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक **श्री. साहेबराव एस खिलारी** यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ११ | ११ | ०-१६-० | ०-१९ |
| ११ | १२ | ०-२६-० | ०-२२ |
| ११ | १३ | ०-२४-० | ० -२२ |
| ११ | १४ | ०-०६-० | ०-०३ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०५/१०/२०२४

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## उपविभागीय अधिकारी, रोहा उपविभाग, रोहा यांच्या न्यायालयात

### जाहीर नोटीस

आरटीएस अपील क्रमांक:- ५२/२०२३,

१. सुनिल यशवंत कुंभार/वाघोस्कर
रा. परळी ता. सुधागड जि. रायगड
२. राजश्री नारायण धाटावकर **अपिलार्थी**
रा. दमखाडी ता.रोहा जि. रायगड
३. प्रमिला अनिल गव्हाणकर
रा. उलवा नोड, सेक्टर २१, के. जे. मारेश्वर, प्लॉट नं. ९७ रूम नं.७०२ ता.पनवेल जि. रायगड.
४. सरस्वती यशवंत कुंभार/वाघोस्कर

**विरुध्द**

१) तुकाराम बाबू उर्फ सिताराम कुभांर/ वाघोस्कर
२) रमेश उर्फ सिताराम कुभांर/वाघोस्कर
रा. परळी ता. सुधागड जि. रायगड
३) अनिता दत्तात्रेय चिपळूनकर
रा. जुने माणगांव ता. माणगांव जि. रायगड
४) वनिता काशिनाथ जामसुतकर
रा. वैभवशाली बिल्डींग, सावली, सेक्टर २ घणसोली, नवी मुंबई
५) ज्योत्स्ना जनार्दन बोरीटकर
रा. प्लॅट नं. ३०७, तिसरा मजला, अक्षदीप अपार्टमेंट, रामु कंपाऊड पारस हॉस्पीटल जवळ, विर सावरकर मार्ग विरार पूर्व मुंबई
६) सुनंदा यशवंत कुंभार/वाघोस्कर ७) सुनंदा रमेश चौघुले
रा. परळी ता. सुधागड जि. रायगड रा.प-५,आशिर्वाद को.ऑप.हौ.सोसायटी फ्रेडस कॉलनी व्हीलेज पुर्व मुंबई ता.कुर्ला, जि. मुंबई उपनगर
८) भरत मारुती हारपुडे ९) दत्ता धोंडू सावंत
रा. लोणावळा ता. मावळ जि.पुणे रा. खांबेवाडी ता. खालापूर जि. रायगड
१०) हरीश्चंद्र धोंडू सावंत मयत १०/१. शिल्पा हरीशचंद्र सावंत
१०/२.आकाश हरीश्चंद्र सावंत १०/३.अंकिता हरीश्चंद्र सावंत
सर्व रा. खांबेवाडी ता. खालापूर जि. रायगड
११) वसंत धोंडू सावंत १२) प्रविण यशवंत सावंत
रा. खांबेवाडी ता. खालापूर जि. रायगड
१३) अविनाश गोपीनाथ सावंत मयत १३/१. सुनंदा गोपिनाथ सावंत
१३/२. अमिता अशोक मोरे १३/३. संस्कृती जयेश मोरे सर्व रा. रा. खांबेवाडी ता. खालापूर जि. रायगड १४) निखील इंदूर कपूर
१५) कमला इंदूर कपूर
रा. १६ बी, अरूण बिल्डींग, नारायण दाभोळकर रोड,मुंबई **उत्तरार्थी**
१६) प्रविणचंद अमृतलाल मेहता
रा. ४९ माउंट युनिट, ७ वा मजला, पेड्डर रोड, मुंबई
१७) जोश ॲन्थोनी कल्लारकर
रा.अे-३९०/३९१, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरीया, एम. आय. डी. सी. महापे, नवी मुंबई ४००७१०
(१८) श्री. नामदेव रामा भगत
रा. फ्लॅट नं. १६०१/१६०२, पुनम टॉवर, सेक्टर २०, नेरूळ, नवी मुंबई

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात मौजे- नेरे, ता. सुधागड येथील गट नं. २१/८, २३/५, २५/४, २५/५, २६/४, २७/0, ८/४ या मिळकतीवरील फेरफार नोंद क्र. ७६९, १०००, १०९५, १०९६, १०९७, १११०, ११११, ११६७, १९८६, व मौजे परळी येथील फेरफार नोंद क्र. ५३३ च्या विरोधात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये या कार्यालयात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक २१/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वत: अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.
दि. ०१/१०/२०२४.

सही/-
**उपविभागीय अधिकारी**
**रोहा विभाग रोहा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री राहुल जनार्दन पाटील रा. कैरे ता. खालापुर जि. रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री बंधु परशुराम खडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे - गुढवण तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७७/२७/ब | ०-३३-०० | ०-२० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :०५/१०/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९१११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
**ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१**

## शुद्धीपत्रक

### पेण नगरपरिषद, पेण

### ई-निविदा सूचना सन २०२४-२०२५

पेण नगरपरिषद, पेण जि. रायगड यांजकडून सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षासाठी Construction & Installation of Machinery For Solid Waste Manegement Plant Under Sbm-2 At Waste Processing Plant, Pen, या कामाची निविदा रद्द करणेत येत आहे. सदर कामासाठी नव्याने निविदा प्रसिध्द करणेत येत असून या कामासाठी दिनांक -०५/१०/२०२४ ते दि.१२/१०/२०२४ पर्यंत अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून निविदा/दरपत्रक मागविणेत येत आहेत. सदर कामासाठी इसारा रक्कम रू.९३,४१९/- मात्र निविदा व फॉर्म फि १०००/- मात्र इतकी राहिल. निविदा उघडण्याचा दिनांक-१४/१०/२०२४ पर्यंत राहिल.

सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना, आवश्यक असण-ारी कागदपत्रे, निविदा फॉर्म फी, इसारा रक्कम भरणे व शुद्धीपत्रक इत्यादी विषयी माहिती http: www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. वरील कामाची निविदा : www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन मिळेल

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**पेण नगरपरिषद, पेण**

## ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक

### ता. माणगाव, जि. रायगड

### निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदारा/पुरवठादार कडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/गावाचे नाव | कामाचे परिणाम (संख्या) | निधीचा स्तोत्र | रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा अंतिम तारीख | निविदा सादर करणेचा वेळ | निविदा सादर करणेचा ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | First AND KIT | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्राप स्तर | १००००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| २ | कविलवहाळ कोंड शाळेचे शौचालय दुरूस्ती करणे. | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्राप स्तर | ५००००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५०० | २००/- |
| ३ | सर्व शाळांना स्वच्छताविषयक साहित्य पुरविणे. | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्राप स्तर | १६६२५/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ४ | मेडीक्लोर घेणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्राप स्तर | ४००००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ५ | मुलामुलींना संगणक प्रशिक्षण देणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्राप स्तर | ५००००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ६ | शाळेतील मुलांना स्कॉलरशिप व नवोदय पुस्तके घेणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | १०७३२/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ७ | सर्व शाळांना खेळाचे साहित्य पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ३६९५७/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ८ | खिंड आ. वाडी अंगणवाडी स्वच्छता विषय संदेश लिहिणे व रंगरंगोटी करणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ३०६५०/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ३०६ | १००/- |
| ९ | अंगणवाड्यांना आर.ओ.Filter घेणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ३०६५०/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| १० | कविलवहाळ कोंड अंगणवाडी स्वच्छता विषय संदेश लिहिणे व रंगरंगोटी करणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ३६७८३/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ३६७ | १००/- |
| ११ | धनगरवाडी येथे कंपोस्ट खड्डे बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ५८२३५/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५८२ | १००/- |
| १२ | खिंड आ. वाडी शाळेला पाण्याची व्यवस्था करणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ५८२३५/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५८२ | १००/- |
| १३ | कविलवहाळ खुर्द बौद्धवाडी स्मशानभूमी चौथरा दुरूस्त करणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ६९८८८/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६९८ | २००/- |
| १४ | उन्द्रेवाडी विहीर दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ७०४९५/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७०४ | २००/- |
| १५ | धनगरवाडी विहीर दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ७०५०५/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७०५ | २००/- |
| १६ | ग्रा.पं. हद्दीतील विहीरींना जाळ्या बसविणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ९००००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९०० | २००/- |
| १७ | कविलवहाळ बंधाऱ्यातील गाळ काढणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ ग्रा.पं. स्तर | ५१०००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५१० | १००/- |
| १८ | कविलवहाळ बु. स्मशानभूमी जवळ निवारा शेड बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २३/२४ | १०००००/- | १ वर्ष | १०/१०/२०२४ | सायं.५.०० | ग्रा.पं. कार्यालय वा. पर्यंत | १००० | २००/- |

**अटी व शर्ती:-** १) प्राप्त निविदा दि. ११/१०/२०२४ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा.पं. कविलवहाळ बुद्रुक येथे मा. सरपंच यांच्या समक्ष उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांना राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं. चे सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रूक**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक**
**ता. माणगाव, जि. रायगड**

## ग्रुप ग्रामपंचायत होडगाव

### ता. माणगाव जि. रायगड

### जाहीर निविदा

नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि ०३/१०/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत होडगाव ता. माणगांव जि. रायगड यांज कडून खालील कामा करिता जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि. ११/१०/ २०२४ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय होडगाव येथे दुपारी ११:०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे नाव/साहित्याचे नाव | योजेनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | कोरे निविदा फार्म फी | १% इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विंचवली शाळा पाणीटाकी दुरूस्ती | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| २ | होडगांव शाळा पाणी टाकी दुरूस्ती | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| ३ | शाळा/अंगणवाडी ओला सुखा कचरा डसबिन | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| ४ | शाळा स्वच्छता संदेश व सुशोभिकरण | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| ५ | शाळेतील मुलांना स्कॉलरशिप व नवोदय पुस्तक | १५ वा वित्त आयोग | २५६०८ | १ महिने | १०० | |
| ६ | अंगणवाडया स्वच्छता संदेश व रंगरंगोटी | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| ७ | महिला आरोग्य शिबिर | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| ८ | अंगणवाड्याना आरोग्य विषयक डिजीटल वजन काटे | १५ वा वित्त आयोग | १८२४३ | १ महिने | १०० | १८२ |
| ९ | होडगांव आदिवासी वाडी पाणी साठवण टाकी बांधणे | १५ वा वित्त आयोग | १२५६३३ | १ महिने | १०० | १२५६ |
| १० | मागासवर्गीय वस्तीतील समाजमंदीर दुरूस्ती व आवश्यक साहित्य पुरविणे | १५ वा वित्त आयोग | ७५३८० | १ महिने | १०० | ७५३ |
| ११ | विचवली स्मशान चौथरा व शेड दुरूस्ती | १५ वा वित्त आयोग | १००००० | १ महिने | १०० | १०० |
| १२ | हातकेली सुनिल शिर्के यांचे घराशेजारील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग | ५०६३२ | १ महिने | १०० | ५०६ |
| १३ | शैलेश शिर्के यांचे पोल्टी शेजारी सार्वजनिक शौचालय दुरूस्ती | १५ वा वित्त आयोग | ५०६३२ | १ महिने | १०० | ५०६ |
| १४ | खर्डी खुर्द विहीर दुरूस्ती | १५ वा वित्त आयोग | ७३८७७ | १ महिने | १०० | ७३८ |
| १५ | घनकचरा व सांडपाणी व्यस्थापण बाबी | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिने | १०० | ५०० |
| १६ | ग्रामपंचायत कार्यालय आवश्यक साहित्य खरेदी | १५ वा वित्त आयोग | ४२४२७ | १ महिने | १०० | ४२४ |

**अटी व शर्ती:**
१. प्राप्त निविदा दि. ११/१०/२०२४ रोजी दु.१२:०० वाजता ग्रा. प. होड्गाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२. निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी
३. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४. कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील
५. निविदा मंजूरी अंती ठेकेदार/पुरवठादार यांस रितसर करारनामा करून घावा लागेल.
६. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहीत केलेल्या मुदीतचे काम पुर्ण करणे बंधणकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व ज्ञाप्ती लागू करण्यात येईल.
७. साहित्य व वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.
८. निधीच्या उपलब्धतेनुसार देयक अदा केली जातील.
९. नोंदणीकत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
१०. ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व प्रणालीशी संलग्न असावे.
११. कायद्याचा देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगाव**
**ता. माणगांव जि.रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगाव**
**ता. माणगांव जि.रायगड**

# कलासक्त

# एक शापीत गंधर्व काशिनाथ घाणेकर

श्रीराम शेटये



> रंगमंचावरील अभुतपूर्व एन्ट्री म्हणजे डॉ. काशिनाथ घाणेकर यांची एन्ट्री. त्यांच्या एन्ट्रीलाच प्रेक्षकांमधून टाळ्यांचा कडकडाट होत असे. 'रायगडला जेव्हा जाग येते' हे डॉ. काशिनाथ घाणेकर यांचे पहिले गाजलेले नाटक. वसंत कानेटकर लिखित या नाटकातील संभाजीची भुमिका डॉ. काशिनाथ घाणेकर करीत असत. 'रायगडला जेव्हा जाग येते' या मनोविश्लेषणात्मक पहिल्या ऐतिहासिक नाटकाने डॉ. घाणेकरांवर आणि या नाटकावर सारख्या उलट सुलट चर्चा झडत होत्या. संभाजीची भुमिका अतिशय लोकप्रिय झाल्याने काशिनाथ घाणेकर सतत प्रसिद्धिच्या झोतात होते.

परंतु डॉ. काशिनाथ घाणेकर या एका प्रतिथयश डॉक्टरने रंगभूमीवर का यावे? त्याकाळात रंगभूमीवर फारसे पैसेही मिळत नसत. अशा काळात मुंबईतील वरळी सारख्या उचभ्रू वस्तीत असणारा प्रशस्त फ्लॅट आणि घरात चालू असलेला दवाखाना हे सर्व वैभव असताना नाटकात काम का करावे?

काशिनाथ घाणेकर यांचे वडील सरकारी डॉक्टर होते. त्यामुळे त्यांची गावोगावी बदली होई. अशावेळी काशिनाथ घाणेकर यांचा जन्म राजापूरमध्ये झाला होता. काशिनाथ घाणेकर यांची एक आत्या त्याच वेळेस काशिवरुन तिर्थयात्रा करून आली होती. म्हणूनच या नवजात बालकाचे नामकरण 'काशिनाथ' असे करण्यात आले होते. त्यांना आणखी सात भाऊ व एक बहिण होती. डॉ. काशिनाथ सगळ्यात धाकटे शेंडेफळ. या आठही मुलांना डॉक्टरांच्या वडिलांनी यथाशक्ती शिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविले होते. गजाननराव, परशुराम आणि काशिनाथ हे तिघे डॉक्टर झाले. नरहरपंत इन्कमटॅक्स ऑफिसर झाले, भार्गवराम मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह झाले. शामराव एअर इंडियामध्ये सेवेत रुजू झाले. सर्वात मोठे बंधू कोल्हापूरात स्थायिक झाले. एकुलत्या एका मुलीचा माधवराव काळे या सुशिक्षित तरूणाशी विवाह करून दिला.

डॉ. घाणेकर यांचे वडील निव्वळ शिक्षण पुर्ण होईपर्यंतच मुलांना अर्थसहाय्य करीत असत. पदवी मिळाल्यावर मुलांना कोणतीही कुबडी ते देत नसत. ज्याने त्याने स्वतःचा मार्ग निवडावा अशी त्यांची धारणा होती. आपल्या वडिलांनी आपल्या कुटूंबासाठी घेतलेले कष्ट आठवले की काशिनाथ घाणेकर यांना गहिवरुन येई. त्यांचे वडील पहाटे बॅग भरून निघत ते रात्रीच परत येत असत. त्यावेळी दळणवळणाची साधने तरी कुठे होती? कुठे सायकल चालवत तर कुठे पायी चालत काशिनाथ घाणेकर यांचे वडील पेशंट तपासायला गावोगावी जात असत. साधारण १९४६ मध्ये ते चिपळूणात स्थायिक झाले. तसे त्यांचे मुळ गाव साखरपा. काशिनाथ घाणेकर यांच्या वडीलांची काही मते घाणेकरी विशेषतः दाखविणारी होती. त्यांनी आपल्या दारावर आपल्या नावाची पाटी कधीही लावली नाही. डॉक्टर घाणेकर कुठे रहातात? हे माणसे शोधत आली पाहिजेत अशी त्यांची धारणा होती. रामायण, महाभारतापेक्षा मुलांनी 'केसरी' हे लोकमान्यांचे वर्तमानपत्र वाचावे असे त्यांना वाटे.

काशिनाथ घाणेकर यांना शिक्षणाबरोबरच नाटकाचे वेड होते. परंतू त्यांच्या वडीलांना हे मंजूर नव्हते. डॉज गाडीतून फिरणाऱ्या दामुअण्णा मालवणकर यांच्या दिमाखाचा काशिनाथ घाणेकर यांना हेवा वाटायचा. नटवर्य नानासाहेब फाटक यांनी काशिनाथ घाणेकर यांच्यावर आपल्या अभिनयाने गारुड केल होत. त्राटीकेमध्ये नानासाहेबांनी केलेल्या भुमिकेने ते काशिनाथ घाणेकर यांचे आदर्श हिरो बनले होते. नानासाहेब बोलतात कसे? चालतात कसे? याकडे काशिनाथ घाणेकर यांचे लक्ष लागून राहिलेले असे. काशिनाथ घाणेकर यांनाही आपण नाटकात काम करावे असे वाटायला लागले होते. नाटकाच्या वेडापायी अभ्यासात स्वारस्य उरले नव्हते. एफ. वाय. ला एटी. केटी.लागली. इंटर सायन्सला दाखल झाले परंतू परीक्षेला कोराच पेपर टाकून आले त्यामुळे आईवडील खुप नाराज झाले. चिपळूणमध्ये राहण्याचा वैताग आला होता. घर सोडलं आणि कोल्हापुर गाठलं अंबाबाई च्या पारावर पथरी टाकून रात्र काढली. एका तमासगीर मित्रा सोबत काही काळ तमाशा कलावंत सोबत काढला. नाटकाच्या नादापाई हे सर्व घडत होते.

परंतू आई वडीलांनी कान उघडणी केल्यावर परत शपथ घेतली. डेंटल कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक काढू असे आश्वासन वडीलांना दिले आणि पाळलेही. परीक्षेत प्रथम क्रमांक काढून सुवर्णपदक मिळविले.

मेडिकल कॉलेजमध्ये काही काळ लेक्चररची नोकरी केली आणि मग वरळीला स्वतःचा दवाखाना सुरु केला. सर्वकाही मनासारखे होत होते. पण अभिनय आणि नाटकाची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती.

यथावकाश ईरावती कर्णिक या डॉक्टर तरूणीशी त्यांचा विवाह झाला. लालबागला गणेश टॉकीज ला लागून डॉक्टर ईरावती कर्णिक यांचा दवाखाना होता. त्या स्त्रिरोगतज्ञ होत्या तसेच डॉक्टर काशिनाथ घाणेकर यांचा स्वतःचा दवाखाना वरळीतील त्यांच्या प्रशस्त अशा घरात होता. दोघांचीही प्रॅक्टिस चांगली चालली होती.

परंतू शौक म्हणून घाणेकर यांचे नाटकात काम करणे चालूच होते. 'रायगडला जेव्हा जाग येते' या वसंत कानेटकर लिखित नाटकात त्यांनी काम केले तेव्हा त्यांची त्यातील संभाजीची भुमिका खुप गाजली. आय.एन. टी. च्या 'माते तुला काय हवे' या नाटकात नटवर्य नानासाहेब फाटक यांच्यासमोर घाणेकर मोठ्या ताकदीने उभे रहात. त्यांची ही भुमिका पाहूनच 'दी गोवा असोसिएशन' संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची संभाजीच्या भुमिकेसाठी निवड केली होती.

डॉ. काशिनाथ घाणेकर यांच्या मते 'रायगडला जेव्हा जाग येते' च्या यशाने त्यांच्या घरातील मंडळीचा आई-वडील व भाऊ यांचा दूरावा कमी झाला होता. नाटकात काम करणे म्हणजे वेळेचा अपव्यय म्हणणाऱ्या त्यांच्या वडिलांनी आपले शब्द मागे घेतले होते. थोरल्या बंधूसोबत असलेला बऱ्याच दिवसाचा दुरावा संपला होता.

'रायगडला जेव्हा जाग येते' या नाटकाने घाणेकर यांच्या व्यावसायिक यशाचा पाया घातला. त्यांच्यासाठी चित्रपट उद्योगाची दारे उघडली. मराठा तितुका मेळवावा, पाहू रे किती वाट आणि सुखाची सावली या तीन तीन चित्रपटात त्यांची भुमिकाही निश्चित झाली.

नंतर डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी मागे वळून पाहिले नाही. 'गारंबीचा बापू'मध्ये त्यांनी उभा केलेला बापू याबद्दल किती आणि काय सांगावे? बापूचा भाबडेपणा, बापूचा रांगडेपणा आणि अफाटपणा डॉक्टरांनी सही सही दाखवला. मुख्य म्हणजे डॉक्टरांचा बापू कोकणातल्या मातीशी ईमान राखणारा होता. लहान लहान मुलांसारखा रुसणारा, अन्यायाने पेटून उठणारा, मुसाशेठ सारखा सुपारीचा बडा व्यापारी होण्याची स्वप्न पहाणारा बापू, विठोबासाठी हळवा होणारा पण आपण 'अक्करमाशा' आहोत हे समजल्यावर अंतर्बाह्य उन्मळून पाडणारा, फूटून तडफडणारा, गलितगात्र होणारा अशी बापूची कितीतरी रूपे डॉक्टर काशिनाथ घाणेकर यांनी सजीव केली.

आपल्या असामान्य अभिनयाने संपुर्ण रंगभूमी आणि चित्रपट विश्वाला अचंबित करणाऱ्या या महान कलावंताच्या वैयक्तिक आयुष्यात मात्र एक शोकांतिका होती. आपल्याकडे सर्व वैभव असुनही घरात पाळणा हलत नाही संतान सुख नाही या कारणाने डॉक्टर हताश होते.

या कारणाने डॉक्टर दारू प्यायला लागले. मित्रांच्या संगतीत जायला लागले. ते घराबाहेर जाऊ नयेत म्हणून त्यांची डॉक्टर असलेली पत्नी त्यांच्यासाठी घरात दारूच्या बाटल्यांचे बॉक्सच्या बॉक्स भरून ठेवत असे. घरात बसून प्या म्हणायची. परंतू इतका प्रतिथयश डॉक्टर आणि अभिनेता कधी कधी वरळीच्या फुटपाथवर दारू पिऊन पडायचा आणि बायको त्यांना घरी घेऊन जायची तेव्हा नियतीचा हा खेळ पाहून चाहत्यांना धक्का बसायचा. कारण कोणालाच माहिती नसायचे हे दुर्दैवाने खुपच क्लेशदायक होते. ●●








नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

भारत सरकार | महाराष्ट्र शासन ऊर्जा विभाग | MAHA SOLARAGRO | महावितरण



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

मा. पंतप्रधानांच्या शुभहस्ते

शेतीसाठी जगातील सर्वात मोठा 'विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प' (१६,००० मेगावॅट)
पीएम कुसुम, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत

पहिल्या ५ सौर पार्कचे (१९ मेगावॅट) लोकार्पण

दि. ५ ऑक्टोबर २०२४, स्थान – पोहरादेवी, जि. वाशिम

- येत्या अठरा महिन्यांत ४५ लाख शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा सौर ऊर्जेचा पुरवठा
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वीज कंपनीची स्थापना
- ग्रामीण क्षेत्रात ६५,००० करोड रु. ची गुंतवणूक
- ५०००० ग्रामीण रोजगार निर्मिती



प्रमुख उपस्थिती

सी. पी. राधाकृष्णन – राज्यपाल
एकनाथ शिंदे – मुख्यमंत्री
शिवराजसिंह चौहान – केंद्रीय मंत्री, कृषि आणि शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास
राजीव रंजन सिंह ऊर्फ ललन सिंह – केंद्रीय मंत्री, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, पंचायतराज, दुग्धविकास
देवेंद्र फडणवीस – उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री
अजित पवार – उपमुख्यमंत्री
प्रतापराव जाधव – केंद्रीय राज्यमंत्री, आरोग्य व कुटुंबकल्याण आणि आयुष मंत्रालय
राधाकृष्ण विखे पाटील – मंत्री, महसूल, पशु संवर्धन व दुग्धविकास
गिरीश महाजन – मंत्री, ग्रामविकास,पंचायतराज, पर्यटन
संजय राठोड – मंत्री, मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री, वाशिम जिल्हा
धनंजय मुंडे – मंत्री, कृषी


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)